म. ग्रं. सं. वाचनालय ठाणे.
ग्रंथ ३११८०
दा. क्र. २००३४
IRBK-0120004

वाचनालय
नाटक
20008
२८/७०/८३
२८/७०/८४
२८/७०/८५

...C 2001.

18 APR 20

सुरेश खरे

ph. 4458577
4464996

# ...ांचेचा चंद्र

जोशी ब्रदर्स बुकसेलर्स ॲण्ड पब्लिशर्स
अप्पा बळवंत चौक, पुणें २

मूल्य : पांच रुपये

IRBK-0120004
IRBK-0120004

या नाटकाच्या प्रकाशनाखेरीज भाषांतर, रूपांतर,
नभोनाट्य, पटकथा, प्रयोग वगैरे सर्व हक्क
सौ. सुप्रिया खरे, डी–२४, बालगोविंद को-ऑपरेटिव्ह
हाउसिंग सोसायटी, टायकलवाडी, माहीम, मुंबई १६,
यांजकडे आहेत. पूर्वसंमतीशिवाय या नाटकाचा
कोणत्याही प्रकारे उपयोग केल्यास कायदेशीर
इलाज केला जाईल.

— सुरेश खरे

पहिली आवृत्ती : मार्च १९७०
दुसरी आवृत्ती : डिसेंबर १९७२

सर्व हक्क स्वाधीन

प्रकाशक : केशव वामन जोशी
२५ बुधवार पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणें–२

मुद्रक : शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय, २९१ शनिवार पेठ, पुणे–३०

ती. आईस—

२०००४ २८।१०।८३
नाटक

**भूमिका**

कचकड्याच्या दुनियेंतल्या एका कळसूत्री बाहुलीची ही कहाणी. चंदेरी विश्वांतली तेजस्वी तारका. रुपेरी पडद्यावरची अनभिषिक्त सम्राज्ञी. पण ती रुपेरी पडद्यावर, चंदेरी दुनियेंत. स्वतःच्या आयुष्यांत...छे! तें आयुष्य तिचं स्वतःचं नव्हतंच...! ती एक दासी होती. भोगदासी, गुलाम! गुलाम सम्राज्ञी. आयुष्यभर ती नाचली कुणाच्या तरी तालावर. तिच्या आयुष्याच्या दोऱ्या सारख्या कुणी तरी खेचल्या होत्या तिच्या इच्छेविरुद्ध, आणि ती नाचली होती भोंवळ येईपर्यंत. लहानशीं स्वप्नं उराशीं बाळगलेली एक गोड कळी. त्या स्वप्नांचे निखारे झाले! तिचा दोष नसतांना, तिचा अपराध नसतांना! कां? कसे? कुणी? कशासाठीं? नुसते प्रश्न... मन अस्वस्थ करणारे, मति गुंगवून टाकणारे, चक्रावून टकणारे...! तिला काय जपायचं होतं! काय जमवायचं होतं? काय मिळवायचं होतं? पुन्हां प्रश्न! याचीं उत्तरं शोधलीं पाहिजेत. ही शोकांतिका शब्दांत रेखाटली पाहिजे. कशी? शब्द अपुरे पडतील इतकी ही भयंकर विलक्षण कहाणी. मन अस्वस्थ झालं. त्या अस्वस्थतेनं झपाटून टाकलं. आत्मविश्वास नव्हता. माझी लेखणी हें सारं शब्दांत पकडायला समर्थपणं पुरी पडेल का? अपयश आलं तर? व्यक्तिगत अपयशाचं दुःख झालं नसतं. पण एक नाट्यमय जीवन, ती कथा फुकट गेली असती हें दुःख मोठं. लेखणी उचलायला धीर होत नव्हता, पण मग एकाएकीं आत्मविश्वास निर्माण झाला. कारण... नंदकुमार रावते! मला माझ्या या मित्राचं नेहमींच एक आश्चर्य वाटत आलं आहे. एखादी कलाकृति माझ्याकडून कशी निर्माण होणार आहे हें माझ्यापेक्षां

त्यांनाच जास्त चांगलं आणि अचूक कळतं. आणि शेवटीं 'कांचेचा चंद्र' रंगभूमीवर आलं.

'ललित-कला-साधने'नं हें नाटक रंगभूमीवर आणलं! अत्यंत दर्जेदार अभिनयानं आणि निर्मितिमूल्यानं नटवून प्रयोग सादर केला. हें भाग्य फार थोड्या नाटकांच्या वांट्याला येतं. त्यांच्याकडून कांहींच कमी पडलं नाहीं. नाटकाच्या यशांत त्यांचा वाटा मोठा.

या नाटकाचं रसिकांनीं स्वागत केलं. त्यांना आवडलं. माझ्या अपेक्षेपलीकडे त्यांनीं या नाटकाला दाद दिली. मराठी प्रेक्षकाविषयीं आतां मला विश्वास वाटायला लागला आहे. वेगळ्या विषयांवरचीं नाटकं केवळ विषय चाकोरीबाहेरचा आहे म्हणून त्याच्याकडे पाठ फिरवणार नाहींत. चाकोरीबाहेरचं नाटक ( चांगलं असेल तर ) ते त्याला जरूर दाद देतील.

या नाटकाचं यश असेल तर मुळांत सामर्थ्यवान् असलेल्या कहाणीचं. अपयश असेल, कांहीं कमी पडलं असेल तर ती जबाबदारी माझी. हें नाटक पाहतांना अगर वाचतांना कुठं कुणाचं काळीज गलबललं, डोळ्यांच्या कडा ओल्या झाल्या तरी मला कृतकृत्य वाटेल!

मुंबई,
एक मार्च एकोणीसशेसत्तर

**सुरेश खरे**

‘ कांचेचा चंद्र ’ या नाटकाचा प्रथम प्रयोग शुक्रवार, दिनांक चौदा नोव्हेंबर एकोणीसशेएकूणसत्तर रोजी साहित्य संघ मंदिर, मुंबई, येथे सादर करण्यांत आला.

त्यांत भाग घेणारे कलावंत :

| | | |
|---|---|---|
| अण्णा | ◻ | गजानन भोसले |
| आई | ◻ | अंजली मोने |
| बाबुराव | ◻ | नंदकुमार रावते |
| मास्तर | ◻ | रमेश होनावर |
| विश्वनाथ | ◻ | विनायक जोशी |
| शकुंतला | ◻ | सुनील प्रधान |
| प्रभा | ◻ | प्रभा जोशी |
| राजशेखर | ◻ | दत्ता मोने |
| रामलाल | ◻ | हरीश पाठारे |
| चंदर | ◻ | मनोहर देशपांडे |
| उपेंद्रकुमार | ◻ | चंद्रकान्त परुळकर |

शिवाय

परशुराम सराफ आणि विनोद आचरेकर

नेपथ्य आणि

| | | |
|---|---|---|
| प्रकाशयोजना | ◻ | बाबा पार्सेकर |
| ध्वनिसंकलन | ◻ | कांति मडिया, राजा बापट |
| रंगमंच | ◻ | छोटा लिमये, रमेश लउळ, सदाशिव क्षीरसागर |
| रंगभूषा | ◻ | बाबा वर्दम |
| दिग्दर्शक | ◻ | नंदकुमार रावते |

'कांचेचा चंद्र' या नाटकाचा व्यावसायिक रंगभूमीवर प्रथम प्रयोग दिनांक चौदा फेब्रुवारी एकोणीसशेंसत्तर रोजीं दुपारीं चार वाजतां शिवाजी मंदिर, दादर, मुंबई, येथें सादर करण्यांत आला.

त्यांत भाग घेणारे कलावंत :

| | | |
|---|---|---|
| अण्णा | ◻ | दीनानाथ लाड |
| आई | ◻ | तारा पाटकर |
| बाबुराव | ◻ | श्रीराम लागू |
| मास्तर | ◻ | हिंदुराव पाटील |
| विश्वनाथ | ◻ | नरेन चव्हाण |
| शकुंतला | ◻ | भावना |
| प्रभा | ◻ | कुंदा निरगुडकर |
| राजशेखर | ◻ | शशिकान्त महाडिक |
| रामलाल | ◻ | सुधाकर गंगोळी |
| चंदर | ◻ | लीलाधर कांबळी |
| उपेंद्रकुमार | ◻ | मोहन दळी |

♧

| | | |
|---|---|---|
| निर्मिती | ◻ | कलावैभव |
| नेपथ्य आणि प्रकाशयोजना | ◻ | बाबा पार्सेकर |
| ध्वनिसंकलन | ◻ | कांति मडिया, राजा बापट |
| रंगमंच | ◻ | गोट्या सावंत, मधु राऊत, तुकाराम |
| रंगभूषा | ◻ | शांताराम विचारे |
| सूत्रधार | ◻ | मोहन तोंडवळकर |
| दिग्दर्शक | ◻ | नंदकुमार रावते |

# अंक पहिला

## दृश्य पहिलें

[ पुण्यांतील एका जुनाट वाड्यांतील अण्णा भावे यांच्या बिऱ्हाडांतील बाहेरची खोली. जुनाट फर्निचर, पोपडे उडालेल्या भिंती. वकिलाकडे कारकून असलेले अण्णा तुटपुंज्या पगारांत काय सजावट करणार? पण तरीहि आज खोलीचं स्वरूप बदललं आहे, भिंतीशीं रचून ठेवलेल्या गाद्यांवर धुतलेली पण रंग चढलेली चादर. खुर्च्यांवर भरतकामाचे, विणकामाचे नमुने. खोलींतील अडगळ कोपऱ्यांत ठेवायचा— झांकायचा दुबळा प्रयत्न. आज कुणी तरी खास पाहुणे येणार आहेत. शकूला— अण्णांच्या मुलीला— पहायला. पडदा उघडतो तेव्हां अण्णा खुर्चींत वर्तमानपत्र वाचत असतात. वाचण्याचा बहाणाच जास्त. त्यांचं लक्ष नाहीं. ]

**आई :** ( बाहेर येत ) आतां केव्हांहि या म्हणावं, माझ्याकडून सारी तयारी आहे...

**अण्णा :** आणि शकूचं...... ?

**आई :** ती पण तयार आहे— बावरली आहे जरा, एवढंच.

**अण्णा :** चालायचंच— पहिल्यांदांच दाखवतोंय तिला. तुमच्या वेळेला तुम्हांला...

**आई :** पांच—पंचवीस झाले...

**अण्णा :** ऑं ? एवढे ?

**आई :** इश्श— मीं म्हटलं घड्याळांत पांच—पंचवीस झाले. अजून कशी आली नाहींत मंडळी ?

**अण्णा :** येतील, इतकं अधीर नको व्हायला.

**आई :** पोरगी पसंत पडली ना कीं काळजी मिटली.

**अण्णा :** चुकताहांत तुम्ही. काळजी सुरू होईल तिथं. देण्या–घेण्याचं जमलं पाहिजे. ग्रॅज्युएट मुलगा, चांगली नोकरी. त्यांच्या अपेक्षा असतील. बघूं या. प्रभु रामचंद्राची मर्जी.

**आई :** एकादश्णी सांगितली आहे.

**अण्णा :** कशासाठीं ?

**आई :** असूं दे आपली, फुकट नाहीं जायची. मास्तरांना पण वाटतंय् जुळून जाईल इथं म्हणून. त्यांनींच आणलंय् हें स्थळ; जुळून गेलं कीं त्यांनाहि समाधान वाटेल. मास्तर नाहीं आले अजून ?

**अण्णा :** मुलाबरोबरच येणार आहेत ते. त्यांचाच विद्यार्थी आहे तो. ( अण्णांचा मोठा मुलगा बाबू आंतल्या खोलींतून बाहेर येतो आणि बाहेर जायला निघतो. ) कुठं निघालास ? जायलाच हवं आतां ?

**बाबू :** माझं काय काम आहे ?

**आई :** अरे, शकूला पाहायला येणार आहेत आज.

**बाबू :** शकूला, मला नाहीं.

**अण्णा :** तूं भाऊ आहेस तिचा. थांबायला हवं तुला.

**बाबू :** मी इथं थांबून काय करणार ?

**अण्णा :** ( तापून ) बाहेर जाऊन तरी काय करायचंय् तुला ?

**आई :** आज तरी चिडू नका. ती मंडळी यायची वेळ झाली. त्यांच्यादेखत नको उगाच...

**अण्णा :** पण त्याला आहे का त्याचं कांहीं ?

**आई :** बाबू , थांबलास तर काय होईल ? वाईट दिसतं.

**बाबू :** शकू चांगली दिसली कीं खूप झालं. मी हजर राहिल्यानं कार्याला शोभा येणार आहे असं नाहीं. कदाचित् मी नसलों तर तें सगळ्यांनाच जास्त बरं. मुलीचा भाऊ काय करतो म्हणून विचारलं तर ऑक्वर्ड पोझिशन व्हायला नको कुणाची. अण्णा, तुम्हांला काय वाटतं ?

**अण्णा :** तूं जावंस हेंच बरं. ( बाबू कांहीं न बोलतां चपला सरकवतो आणि बाहेर निघून जातो. ) पाहिलंत कसा वागतो हा ? कसा राग आवरायचा ?

**आई :** जाऊं दे. राहिला असता तर बरं झालं असतं, पण गेल्यानंसुद्धां कांहीं अडणार नाहीं ना ?

**अण्णा :** लोकांना फक्त माझं वागणं दिसतं. पण मी असा कां वागतों त्याचा कधीं कुणीं विचार केलाय् ? आईवेगळा पोर म्हणून त्याचे लाड केले, त्याचीं हीं फळं ? तुम्हींसुद्धां त्याला कधीं सावत्रपणानं वागवलं नाहींत. पण तुमचं तरी ऐकलं त्यानं ? उर्मट ! मला दुरुत्तरं करतो...

**आई :** जाऊं दे !– निदान आज तरी. शकूला पहायला यायचे आहेत.

**अण्णा :** म्हणूनच थांबला असता तर काय बिघडलं असतं ?

**आई :** ( विषय बदलीत ) कुणी बाईमाणूस येणार आहे का मुलाबरोबर ?

**अण्णा :** मास्तर म्हणाले नाहींत तसं कांहीं.

**आई :** आलं कुणी तरी मी कांहीं घाबरत नाहीं हो. आपली शकू काय कुणालाहि पसंत पडेल. ( चाहूल लागते. ) मला वाटतं आली मंडळी.

**अण्णा :** ( उठून दाराकडे जातात. ) हो, आलीच.

**आई :** ( जातां जातां ) मी आंतलं पहातें, तुम्ही आहांतच इथं.

( क्षणभर स्तब्धता. अण्णा परत एकदां सगळं व्यवस्थित असल्याची खात्री करून घेतात. मास्तर आणि पंचविशीचा एक साधा तरुण बरोबर येतात. अण्णा उठून दाराकडे जातात. नमस्कार करीत... )

**अण्णा :** या... अगदीं करेक्ट टाइमवर आलांत...

**मास्तर :** हो, उशीर नको उगाच, नाहीं का ? उगाच तिष्ठत बसायला होतं माणसाला.

**अण्णा :** बसा ना... ( दोघेहि बसतात. अण्णाहि बसतात. )

**मास्तर :** हे विश्वनाथ कर्वे; बी. ए. आहेत.

**अण्णा :** ( विश्वनाथला ) आपण रेव्हेन्यू डिपार्टमेंटमध्यें आहांत, नाहीं का ?

**विश्वनाथ :** हो.

**मास्तर :** पर्मनन्ट नोकरी; परत सरकारी. तुम्ही ग्रॅज्युएट मागच्याच सालीं झालां, नाहीं का ?

**विश्वनाथ :** मला " तुम्ही " काय म्हणतां सर ?

**मास्तर** : आतां इथं ' तुम्ही 'च म्हणायला हवं. मान आहे तो. काय ? बरं का अण्णा, हा माझा विद्यार्थी. लहानपणापासून पहातोंय् मी याला. सालस, कष्टाळू...

**विश्वनाथ** : मला वाटतं सर आपण...

**मास्तर** : नाहीं, लक्षांत आहे माझ्या, बोलावतोंय् मी तिला...

**विश्वनाथ** : ( एकदम ) तसं नाही सर. मला म्हणायचं होतं तुम्ही माझी खोटी स्तुति करतांय्. लहानपणींचं खरं नसतं सर. मोठेपणीं माणसं बदलतात. किंवा बदलल्यामुळं मोठीं होतात.

**मास्तर** : छान, छान बोललास ! शकुंतला अशीच हुशार आहे; मॅट्रिकला आहे यंदा. सगळ्या कला येतात तिला. शिवणकाम, भरतकाम, विणकाम, इतकंच नाहीं– गाणं आणि अभिनय यांत पण तिची गति आहे. मला वाटतं, हिंदीच्या परीक्षा दिल्या आहेत ना ?

**अण्णा** : या वर्षींच कोविद झाली.

**मास्तर** : दिसायला...पहाशीलच आतां. पहायचे प्रोग्रॅम आवडत नाहींत तुला. पण आम्ही आपलीं जुनीं माणसं !

**विश्वनाथ** : जाऊं दे सर... त्यांत काय विशेष ? ( क्षणभर स्तब्धता )

**मास्तर** : मग बोलवायचंच का ? ( त्याच्या चेहऱ्यावर संमति. )

[ क्षणभर स्तब्धता... शकू प्रवेश करते. वय अठरा. दिसायला तरतरीत, आकर्षक. येते. मास्तरांना वाकून नमस्कार करते. विश्वनाथ अवघडलेला.]

**मास्तर** : बस... ( शकू खुर्चीवर बसते. ) ( विश्वनाथला– विचारा, काय हवं तें विचारा. संकोचायचं कारण नाहीं... ( क्षणभर स्तब्धता. दोघेंहि एकमेकांना चोरटेपणानें पाहून घेतात. )

**विश्वनाथ** : सर सांगत होते... तुम्ही मॅट्रिकला आहांत.

**शकू** : हो...

**मास्तर** : हो ऽ !

**विश्वनाथ** : असं मध्येंच शिक्षण सोडून देणं आवडेल तुम्हांला ?

**शकू** : आवडणार नाहीं...पण— पण चालेल मला.

**मास्तर** : चालेल...चालेल.

**विश्वनाथ :** खरं...?

**अण्णा :** होऽ चांगला नवरा मिळण्याकरितां तर शिकायचं.

**मास्तर :** हो...ना ?

**विश्वनाथ :** लग्नानंतर शिकायची इच्छा आहे ?

**शकू :** जमलं तर जरूर शिकेन...जमलं तर म्हणजे...( थांबते. )

**विश्वनाथ :** शक्य झालं तर... ( हंसतो. )

**शकू :** हो...

**मास्तर :** तशी हुशार आहे ती, आणि मेहनती पण...

**शकू :** सर ..

**मास्तर :** अच्छा...आम्ही नाहीं बोलत. तुमचं चालूं दे.

**विश्वनाथ :** नाहीं सर, संपलं; आतां आणखी कांहीं नाहीं विचारायचं.

**मास्तर :** म्हणजे नंतर विचारणार...?

**विश्वनाथ :** ( मानेनंच हो म्हणतो, )–तशी सारी माहिती तुम्हीं दिलीच आहे. तेच प्रश्न त्यांना विचारायचे म्हणजे...

**मास्तर :** ठीक आहे...शकुंतला, गाणं म्हण छानसं...

**विश्वनाथ :** त्याची कांहीं गरज नाहीं सर...

**मास्तर :** अरे घाबरतोस काय ? आवाज गोड आहे तिचा...

**विश्वनाथ :** मीं कुठं अमान्य केलं ?

**मास्तर :** मग खरंच नको ?

**विश्वनाथ :** खरंच नको. त्याची कांहीं आवश्यकता नाहीं.

**अण्णा :** तसं पहायला गेलं तर एकदां संसारांत पडल्यावर कशाला लागतंय् गाणं ?

**मास्तर :** वा. असं कसं ? निदान अंगाई गीत गायला आणि दुसऱ्यांच्या लग्नांत मंगलाष्टकं म्हणायला जरूर उपयोग होतो. होतो कीं नाहीं ?

[ स्वतःशींच हंसतात. क्षणभर स्तब्धता ]

**अण्णा :** नागपूरचे कर्वे... रिटायर्ड सबजज्ज होते बघा... त्यांचं तुमचं कांहीं नातं ?

**विश्वनाथ :** नाहीं, कांहीं नाहीं.

**मास्तर** : यांचं घराणं इकडचंच...

**अण्णा** : अस्सं...अस्सं...

**मास्तर** : तिकडे कोंकणांत इस्टेट आहे यांची...

**विश्वनाथ** : इस्टेट कुठची सर...थोडीशी जमीन आहे इतकंच.

**मास्तर** : म्हणजे इस्टेटच ती. स्वतःच्या मालकीची आहे कीं नाहीं, बस्स तर. अण्णा, मी तुमच्याकडे मामुली ठिकाण घेऊन येणार नाहीं.

**विश्वनाथ** : पुरे सर...

**मास्तर** : बरं राहिलं...मी काय सांगायचं यांना तें मागून सांगेन...मग झालं. ( क्षणभर स्तब्धता ) चहा आणायला सांगायचा ?

**विश्वनाथ** : हो, चालेल, ( शकुंतला आंत जाते. चहा घेऊन येते. आई दाराआड उभ्या राहून हळूच पाहून घेतात. ) ( चहा पितां पितां... ) यांचे बंधु कुठं दिसत नाहींत ते ?

**अण्णा** : बाहेर गेलाय्. एव्हांना खरं म्हणजे यायला हवा होता.

**अण्णा** : ( विश्वनाथला ) तुमची जागा आहे ना इथं ?

**मास्तर** : हो, इथंच सदाशिव पेठेंत.

**विश्वनाथ** : तशी फारशी मोठी जागा नाहीं. दोन माणसांना पुरेशी आहे.

**अण्णा** : पण स्वतःची आहे.

**मास्तर** : हो, स्वतःची आहे.

**विश्वनाथ** : भाड्याची आहे.

**मास्तर** : हो भाड्याची आहे.

**अण्णा** : म्हणून काय झालं ?

**मास्तर** : आणि आजकाल करायची काय मोठी जागा ?

**अण्णा** : घरीं आई–वडील आहेत ना ?

**विश्वनाथ** : नाहीं. ते गांवालाच असतात. मी एकटाच असतों इथं. ( चहापान संपतें...क्षणभर स्तब्धता )

**मास्तर** : तुम्हांला बोलायचंय् ना हिच्याशीं ? ( अण्णांना ) आपण जरा आंत जाऊं या का ? म्हणजे—

**अण्णा** : हो, चला. ( अण्णा आणि मास्तर आंतल्या खोलींत जातात. रंगभूमीवर शकू आणि विश्वनाथ... क्षणभर स्तधब्ता )

**विश्वनाथ :** बसा ना आपण.

**शकू :** असूं दे.

**विश्वनाथ :** मग मी उठून उभा राहूं ?

**शकू :** नको; बसते मी. ( बसते. )

**विश्वनाथ :** बोला.

**शकू :** अं– काय बोलायचं ?

**विश्वनाथ :** काय बोलायचं ? कांहींहि बोला.

**शकू :** तुम्हीच बोला.

**विश्वनाथ :** तुम्ही...

**शकू :** तुम्ही काय म्हणतां मला ?

**विश्वनाथ :** तूं म्हणावंसं वाटतं, पण अजून आपण इतक्या जवळ कुठं आलों आहोंत ?

**शकू :** म्हणजे ?

**विश्वनाथ :** आपलं लग्न व्हायचंय् अजून !

**शकू :** इश्श !

**विश्वनाथ :** मला एक आश्चर्य वाटतं. अण्णांनीं— नि आईनीं परवानगी कशी दिली ?

**शकू :** कशाला ?

**विश्वनाथ :** हें असं बोलायला — सरांना मी सांगितलं होतं. मुलगी पहायला माझी हरकत नाहीं, पण होकार देण्यापूर्वीं मला मुलीशीं एकटीशीं थोडंसं बोलायचं आहे. सांगा ना, कशी परवानगी दिली ?

**शकू :** अण्णा तसे थोडेसे नव्या मताचे आहेत.

**विश्वनाथ :** आणि आई ?

**शकू :** आईची समजूत सरांनीं काढली.

**विश्वनाथ :** पण आतां मला वाटतं अशा मागणीला कांहीं अर्थ नाहीं. मला वाटायचं पांच मिनिटांत नुसतं पाहून आयुष्याचा जोडीदार कसा निवडायचा ? पण तें खरं नाहीं.

**शकू :** कां ?

**विश्वनाथ** : माणूस आवडतं क्षणार्धांत. आणि तिथंच सारं ठरतं, संपतं. पुढच्या कशालाच कांहींच अर्थ नसतो. मी तुम्हांला पहायला आलों, पाहिलं. अन् त्या क्षणींच ठरवलं– लग्न करायचं तर तुमच्याशीं. बस्स. पुढं कांहीं विचारावंसं वाटेना. वाटलं, काय विचारायचं? खूप प्रश्न योजून आलों होतों मनाशीं, पण साऱ्यांचीं उत्तरं मिळालीं. म्हणजे एकच उत्तर... तुम्ही मला पसंत आहांत— एकदम पसंत.

**शकू** : (गप्प. लाजलेली)

**विश्वनाथ** : एक मात्र फायदा झाला.

**शकू** : काय?

**विश्वनाथ** : मी जर थांबलों नसतों ना तर तुम्ही लाजल्यावर किती सुंदर दिसतां हें आज मला समजलं नसतं.

**शकू** : उगाच खोटी स्तुति करतांहांत तुम्ही. मला माहीत आहे, मी इतकी सुंदर नाहींये.

**विश्वनाथ** : पण मला वाटतां.

**शकू** : तो तुमचा मोठेपणा...

**विश्वनाथ** : मोठेपणा नाहीं, तें खरं आहे. गंमत म्हणून एक विचारूं? (स्तब्धता) मीं तुम्हांला नापसंत केलं असतं तर... ?

**शकू** : तर काय?

**विश्वनाथ** : तुम्हांला काय वाटलं असतं?

**शकू** : मला ना—

**विश्वनाथ** : सांगा ना, खरं सांगा—

**शकू** : मला— मला— वाईट वाटलं असतं.

**विश्वनाथ** : आणि— आणि राग नसता आला?

**शकू** : मुळींच नाहीं. आणि वाईट पण फार काळ वाटलं नसतं. पुढचा पहायचा प्रोग्रॅम मीं असाच पार पाडला असता.

**विश्वनाथ** : राग कां आला नसता?

**शकू** : सरांची शिकवण— त्यांनीं सांगितलं, कुणी नापसंत केलं तर आपण म्हणायचं, गरीब बिचारा! माझ्यासारखी मुलगी त्याच्या नशिबांतच नाहीं! तो तरी काय करणार?

**विश्वनाथ** : असं म्हणायला सांगितलं ?

**शकू** : हो—पण नापसंत सांगितल्यावर—आधीं नाहीं. तुम्हांला राग आला ?

**विश्वनाथ** : छे, छे ! मुळींच नाहीं. सरांनीं योग्यच सांगितलं. तुम्हांला मी एकच विचारतों, माझ्याशीं लग्न करणं आवडेल तुम्हांला ? ( ती गप्प ) सांगा ना ?

**शकू** : आतांहि खरं सांगायचं ?

**विश्वनाथ** : हो, अगदीं खरं.

**शकू** : आणि तुम्हांला वाईट वाटलं तर—राग आला तर...

**विश्वनाथ** : ( चमकून ) म्हणजे मी तुम्हांला ( थांबतो ) तुम्हीं या प्रश्नाचं उत्तर नाहीं दिलं तरी चालेल. माझा हा प्रश्न तुम्ही विसरून जा.

**शकू** : ( हंसून ) कां ? भीति वाटली ?

**विश्वनाथ** : उगाच रिस्क नको.

**शकू** : तुमचा उगाच गैरसमज झाला. तुम्हांला वाईट वाटेल किंवा राग येईल असं माझं उत्तर नाहींये.

**विश्वनाथ** : खरंच—? ( थांबून ) तसा माझा प्रश्न अगदींच चुकीचा नव्हता. म्हणजे मुलीची पसंती विचारायला नको ?

**शकू** : अस्सं आतां वाटतंय्—

**विश्वनाथ** : तुम्ही छान बोलतां !

**शकू** : इश्श !

**विश्वनाथ** : इश्श काय त्यांत ? खरं सांगितलं.

**शकू** : मी तुमच्याइतकी शिकलेली कुठं आहे ?

**विश्वनाथ** : छान बोलणं अंगचं असतं. शिक्षणाचा काय प्रश्न ? सगळ्याच शिकलेल्यांना छान बोलतां येतं असं नाहीं. ( थांबून ) सर सांगत होते तुम्ही गाणं फार छान म्हणतां. आपल्या अंगांत नाहीं अशी कला.

**शकू** : सर सांगत होते तुम्ही मासिकांतून गोष्टी वगैरे लिहितां.

**विश्वनाथ** : तुम्हीं वाचलीय् एखादी गोष्ट ?

**शकू** : आमच्याकडे मासिकं नाहीं घेत फारशीं...

**विश्वनाथ** : मी लिहितों मधून मधून...पण तसं कांहीं खास नाहीं.

**शकू** : पुढं तुम्ही मोठे लेखक व्हाल.

**विश्वनाथ** : कशावरून ?

**शकू** : मला आपलं उगाचच वाटतं...

**विश्वनाथ** : तुम्हांला वाटतंय् तर कदाचित् होईनसुद्धां. कुणीं सांगावं ? जाऊं दे. खरं सांगायचं तर आतां निघायला हरकत नाहीं. पण अजून पाय निघत नाहीं. विचारायला प्रश्न पण नाहींत. आणि... आणि नुसतं पहात किती वेळ बसायचं ?

**शकू** : ( लाजून ) इश्श !

**विश्वनाथ** : निघण्यापूर्वीं एक सांगतों, आपलं बोलणं घरांत कुणाला सांगायचं नाहीं. माझी पसंती पण सांगायची नाहीं. त्यांना वाटायचं उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग. माझी पसंती मी आठवड्यानंतर कळवीन.

**शकू** : आठवड्यानंतर ?

**विश्वनाथ** : आणखी एक-दोन मुली पहायच्या आहेत या आठवड्यांत.

**शकू** : आणि त्या माझ्याहून चांगल्या असल्या तर ?

**विश्वनाथ** : शक्यच नाहीं.

**शकू** : कां नाहीं ?

**विश्वनाथ** : आणि जरी असल्या तरी मनांतल्या मनांत मीं तुम्हांलाच पसंत करून ठेवली आहे. आतां त्या मुलींना फक्त नांवालाच पहाणार आहे मी.

**शकू** : म्हणजे त्या मुलींच्या भावनांशीं खेळणार तुम्ही ? पहायचं नाटक करणार, त्यांच्या कोवळ्या मनाला आशा लावणार, त्यांच्यापुढं खोटीं स्वप्नं उभीं करणार, त्यांच्या गरजू आई-बापांना मधाचं बोट लावणार आणि चार दिवसांनीं, ' नापसंत ' या एकाच शब्दाच्या फुंकरीनं सारा खेळ उधळणार ! कां ?

**विश्वनाथ** : पण— ?

**शकू** : आयुष्यभर तुम्हांला संधि खेळ खेळण्याची, आणि आमच्या भाग्यांत फक्त कुणाचं तरी खेळणं होणं, नुसतं खेळणं होणं. ( दीर्घ स्तब्धता )

माफ करा, मी...मी...कांहीं तरी बोलून गेलें. नको तें. मीं बोलायला नको होतं. तुमचा गैरसमज होईल माझ्याबद्दल.

**विश्वनाथ :** नाहीं...तुम्ही फार खरं बोललांत. मला तें आवडत नाहीं, पटत नाहीं, पण नाइलाज आहे माझा.

**शकू :** नाइलाज...कां ?

**विश्वनाथ :** त्यांना मीं कळवलंय्सुद्धां...पहायला जायचं ठरलंय् आणि आतां येत नाहीं म्हणून कळवायचं ?

**शकू :** काय हरकत आहे ?

**विश्वनाथ :** वाईट दिसेल.

**शकू :** वाईट वाटेलहि. पण तरीहि आशा लावण्यापेक्षां बरं.

**विश्वनाथ :** मान्य आहे मला तुमचं म्हणणं. पण मी तरीहि कळवीन आठ दिवसांनीं.

**शकू :** बरं...

**विश्वनाथ :** मी निघतों...निघूं ना ?

**शकू :** हं...

**विश्वनाथ :** सांगतां ना तसं घरांत...

**शकू :** हो, ( स्वयंपाकघराकडे जात ) अण्णा...हे ... ( थांबते. ) ते निघाले.

( अण्णा आंतूनच ' हो, आलोंच ' म्हणत असतांनाच प्रकाश जातो. संपूर्ण अंधार... )

## दृश्य दुसरें

[ **स्थळ :** दृश्य तेंच. **काळ :** चार दिवसांनंतरचा. **वेळ :** संध्याकाळची. आई तांदूळ निवडीत बसल्या आहेत. अण्णा आराम-खुर्चीत वर्तमानपत्र वाचत बसले आहेत. ]

**आई :** खरं म्हणजे एव्हांना कळायला हवं होतं.

**शकू** : आमच्याकडे मासिकं नाहीं घेत फारशीं...

**विश्वनाथ** : मी लिहितों मधून मधून...पण तसं कांहीं खास नाहीं.

**शकू** : पुढं तुम्ही मोठे लेखक व्हाल.

**विश्वनाथ** : कशावरून ?

**शकू** : मला आपलं उगाचच वाटतं...

**विश्वनाथ** : तुम्हांला वाटतंय् तर कदाचित् होईनसुद्धां. कुणीं सांगावं ? जाऊं दे. खरं सांगायचं तर आतां निघायला हरकत नाहीं. पण अजून पाय निघत नाहीं. विचारायला प्रश्न पण नाहींत. आणि... आणि नुसतं पहात किती वेळ बसायचं ?

**शकू** : ( लाजून ) इश्श !

**विश्वनाथ** : निघण्यापूर्वीं एक सांगतों, आपलं बोलणं घरांत कुणाला सांगायचं नाहीं. माझी पसंती पण सांगायची नाहीं. त्यांना वाटायचं उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग. माझी पसंती मी आठवड्यानंतर कळवीन.

**शकू** : आठवड्यानंतर ?

**विश्वनाथ** : आणखी एक-दोन मुली पहायच्या आहेत या आठवड्यांत.

**शकू** : आणि त्या माझ्याहून चांगल्या असल्या तर ?

**विश्वनाथ** : शक्यच नाहीं.

**शकू** : कां नाहीं ?

**विश्वनाथ** : आणि जरी असल्या तरी मनांतल्या मनांत मीं तुम्हांलाच पसंत करून ठेवली आहे. आतां त्या मुलींना फक्त नांवालाच पहाणार आहे मी.

**शकू** : म्हणजे त्या मुलींच्या भावनांशीं खेळणार तुम्ही ? पहायचं नाटक करणार, त्यांच्या कोवळ्या मनाला आशा लावणार, त्यांच्यापुढं खोटीं स्वप्नं उभीं करणार, त्यांच्या गरजू आई–बापांना मधाचं बोट लावणार आणि चार दिवसांनीं, ‘ नापसंत ’ या एकाच शब्दाच्या फुंकरीनं सारा खेळ उधळणार ! कां ?

**विश्वनाथ** : पण— ?

**शकू** : आयुष्यभर तुम्हांला संधि खेळ खेळण्याची, आणि आमच्या भाग्यांत फक्त कुणाचं तरी खेळणं होणं, नुसतं खेळणं होणं. ( दीर्घ स्तब्धता )

माफ करा, मी...मी...कांहीं तरी बोलून गेलें. नको तें. मीं बोलायला नको होतं. तुमचा गैरसमज होईल माझ्याबद्दल.

**विश्वनाथ** : नाहीं...तुम्ही फार खरं बोललांत. मला तें आवडत नाहीं, पटत नाहीं, पण नाइलाज आहे माझा.

**शकू** : नाइलाज...कां ?

**विश्वनाथ** : त्यांना मीं कळवलंय्सुद्धां...पहायला जायचं ठरलंय् आणि आतां येत नाहीं म्हणून कळवायचं ?

**शकू** : काय हरकत आहे ?

**विश्वनाथ** : वाईट दिसेल.

**शकू** : वाईट वाटेलहि. पण तरीहि आशा लावण्यापेक्षां बरं.

**विश्वनाथ** : मान्य आहे मला तुमचं म्हणणं. पण मी तरीहि कळवीन आठ दिवसांनीं.

**शकू** : बरं...

**विश्वनाथ** : मी निघतों...निघूं ना ?

**शकू** : हं...

**विश्वनाथ** : सांगतां ना तसं घरांत...

**शकू** : हो, ( स्वयंपाकघराकडे जात ) अण्णा...हे ... ( थांबते. ) ते निघाले.

( अण्णा आंतूनच ' हो, आलोंच ' म्हणत असतांनाच प्रकाश जातो. संपूर्ण अंधार... )

## दृश्य दुसरें

[ **स्थळ** : दृश्य तेंच. **काळ** : चार दिवसांनंतरचा. **वेळ** : संध्याकाळची. आई तांदूळ निवडीत बसल्या आहेत. अण्णा आराम-खुर्चींत वर्तमानपत्र वाचत बसले आहेत. ]

**आई** : खरं म्हणजे एव्हांना कळायला हवं होतं.

**अण्णा** : कशाबद्दल म्हणतांय् तुम्ही ?

**आई** : कर्व्यांकडचं ! होकार—नकार काय असेल तो कळवायला हवा होता.

**अण्णा** : चारच दिवस तर झाले आहेत. अजून वेळ नाहीं गेली.

**आई** : म्हणून नाहीं म्हणत मी.

**अण्णा** : तुम्हांला सगळ्याचीच घाई असते.

**आई** : वेळच्या वेळीं सारं झालं कीं बरं, असं वाटतं मला.

**अण्णा** : वाटणं चूक नाहीं तुमचं, पण असं नुसतं वाटून साऱ्या गोष्टी संपत नाहींत.

**आई** : म्हणजे ?

**अण्णा** : मला तर काळजी पडली आहे होकार आला तर...

**आई** : तर काय ?

**अण्णा** : हें लग्न कसं पार पाडायचं ?

**आई** : निघेल कांहीं तरी मार्ग...

**अण्णा** : कर्जाचा ! आणखी दुसरा कोणता ? आयुष्यभर केलं काय आम्हीं ? तर दुसऱ्यांचीं कर्जं फेडायचीं आणि त्या काळजींत जळत रहायचं ! प्रथम वडिलांचं कर्ज, नंतर बहिणींचीं लग्नं, त्यांचं कर्ज. वाढत्या वयाबरोबर वाढत गेलीं तीं फक्त कर्जे आणि सरत्या वयाबरोबर सरत गेली ती फक्त उमेद !

**आई** : उगाच विषय काढला मीं.

**अण्णा** : तुम्हीं विषय काढलात न काढलात, परिस्थिति थोडीच बदलतेय् ? तुम्हांला संवय व्हायला हवी साऱ्यांची.

**आई** : तुम्ही फार काळजी करताहांत. ( थांबून ) तशीच वेळ आली तर माझ्या पाटल्या आहेत. थोडीशीं चांदीचीं भांडीं पण आहेत.

**अण्णा** : त्यांत लग्न नाहीं व्हायचं.

**आई** : बघूं आपण, करूं कांहीं तरी.

**अण्णा** : तुम्ही अशा रीतीनं बोलतांहांत कीं तिचं लग्न ठरलंच !

[ बाबू येतो. ]

**बाबू** : कुणाचं लग्न ठरलं ?

**अण्णा :** कुणाचं नाहीं...तूं कुठं होतास इतका वेळ? दिवसभर काय केलंस तूं? ( स्तब्धता ) माझं बोलणं ऐकूं येत नाहीं तुला?

**बाबू :** ऐकूं येतंय् पण उत्तर नाहींये माझ्याकडे. मग गप्प नको बसूं तर काय करूं?

**अण्णा :** दिवसभर काय केलंस तूं?

**बाबू :** कांहींच केलं नाहीं मीं. कशाला उगाच तेच तेच विषय?

**अण्णा :** थिएटरवर कशाला गेला होतास तूं?

**बाबू :** तुम्हीं पाहिलंय्?

**अण्णा :** मला उत्तर हवं आहे... प्रश्न नको आहेत. कशाला गेला होतास तूं?

**बाबू :** तुम्हांला काय उत्तर हवंय्?

**अण्णा :** तूं थिएटर्सवर जाऊन काय धंदे करतोस तें मला माहीत नाहीं असं वाटतं तुला?

**आई :** काय झालं असं?

**अण्णा :** तिथं जाऊन काळ्या बाजारांत तिकिटं विकतो हा.

**आई :** होय रे बाबू?

**बाबू :** तुम्हांला समजलं, बरं झालं. कधीं तरी कळणारच होतं, आणि कळायला हवंहि होतं.

**अण्णा :** शरम नाहीं वाटत हे धंदे करायला?

**बाबू :** शरम...? मी पैसे मिळवतोंय्...एवढंच मला समजतंय्.

**अण्णा :** चैनीशिवाय तुला दुसरं दिसतंय् काय?

**बाबू :** तुमच्याकडे कधीं पैसे मागितले नाहींत मीं!

**अण्णा :** मीं दिलेहि नसते.

**बाबू :** म्हणूनच केवळ मागितले नाहींत. माझे पैसे मी कमावतोंय्.

**अण्णा :** अशा मार्गानं!

**बाबू :** मार्ग बरे व वाईट, फरक करत नाहीं मी. चांगल्या गोष्टींची मला आवड आहे आणि त्या मिळविण्याकरितां मार्ग वाईट असले तरी मला चालतील. इथं कुणाला गळ्यांत सर्टिफिकेट अडकवून मिरवायचंय्?

**अण्णा :** ( अगतिक ) कसा झालास तूं असा? खरंच, असा कसा झालास?

**बाबू :** खरंच, मी असा कां झालों– कां झालों मी असा...कसा? फार महत्त्वाचा प्रश्न आहे हा अण्णा! आणि त्याचं उत्तर शोधतां शोधतां मी तुमच्यापर्यंत येऊन पोंचतों. म्हणून आपलं कधींच पटलं नाहीं.— पटणार नाहीं.

**अण्णा :** तुझ्याशीं पटवून घ्यायची गरज नाहीं मला.

**बाबू :** हेंच– हेंच म्हणतों मी.

**अण्णा :** बाबू,...

**आई :** हें पहा, हे वाद कधींच संपायचे नाहींत.

**अण्णा :** खरंच, हे वाद कधींच संपायचे नाहींत.

**आई :** बाबू, तूंसुद्धां किती बोलशील? बरं नाहीं रे हें!

**बाबू :** मला समजतं!

**आई :** मग वागत कां नाहींस तसं?

**बाबू :** तसं म्हणजे कसं?

**आई :** कांहीं नाहीं– पुन्हां वाद नकोत. ( बाबू आंत जातो. )

( दारांत शकूची मैत्रीण प्रभा उभी. हातांत शाळेचीं पुस्तकें )

**प्रभा :** आई...

**आई :** कोण, प्रभा? ये ना आंत. आणि शकू कुठाय्?

**प्रभा :** शकू ना? तिचाच निरोप सांगायला आलें मी.

**अण्णा :** शकू कुठाय्?

**प्रभा :** शाळेंत आहे. सरांनीं फक्त शकूलाच थांबायला सांगितलं. मीहि थांबणार होतें, पण उशीर झाला असता.

**आई :** मास्तरांनीं कां ग थांबवून घेतलंय् तिला?

**प्रभा :** कांहीं कल्पना नाहीं.

**आई :** शाळेंत कांहीं कमी-जास्त झालं का?

**प्रभा :** नाहीं.. तसं कांहीं झालं नाहीं. सर खुशींत होते.

**आई :** ( अण्णांना ) मी सांगतें, होकार असणार त्यांचा.

**अण्णा :** ( खुलून ) बघूं या. येतीलच आतां ते.

**आई :** ( प्रभाला ) बस ना.

**प्रभा** : नको आई, उशीर होईल.

**आई** : पांचच मिनिटं बस. तुझ्याकरितां बघायला सुरुवात केली की नाहीं घरच्यांनीं ?

**प्रभा** : ( लाजत ) हो.

**आई** : मग जमतंय् का कुठं ?

**प्रभा** : अजून नाहीं कुठं जमलं.

**आई** : कुठं दाखवलंय् का तुला ?

**प्रभा** : परवांच पहायला येणार आहेत्.

**आई** : पसंत पडलीस ना, कीं पुढचं सारं व्यवस्थित होईल.

**प्रभा** : तुमचे आशीर्वाद हवेत. आई...शकूचं या ठिकाणीं नक्की जमेल.

**आई** : कशावरून ग ?

**प्रभा** : 'मी नक्की पसंत पडेन' असं म्हणाली ती.

**आई** : अग, पण बाकीच्या खूप गोष्टी असतात.

**प्रभा** : पण तुम्हीच म्हणालांत ना, कीं एकदां पसंत पडली कीं पुढचं सारं व्यवस्थित होईल म्हणून ?

**आई** : ( अण्णांकडे पहात ) हो, तेंहि खरंच.

**प्रभा** : आई, शकूचा मला इतका राग आलाय्,...

**आई** : कां ग ? काय केलंय् तिनं असं ?

**प्रभा** : मीं इतक्या वेळां विचारलं पण नांव नाहीं सांगितलं त्यांचं !

**आई** : अग, लाज वाटते मुलींना.

**प्रभा** : खरंच आई, काय नांव त्यांचं ?

**आई** : नांव ना...

**बाबू** : ( आंतून येत बाहेर जायला निघतो. )

**अण्णा** : आतांच घरांत पाऊल टाकलंस आणि परत कुठं चाललास ?

**बाबू** : बाहेर जातोंय् मी.

**अण्णा** : तेंच कुठं ?

**बाबू** : नाहीं...'तिथं' नाहीं. नुसताच भटकायला जातोंय्. ( जातो.

**प्रभा** : आई, मी निघूं आतां ?

**आई** : चाललीस ?

**प्रभा** : पुन्हां येईन उद्यां. सांगून येईन घरीं म्हणजे कुणी काळजी करणार नाहीं उशीर का झाला म्हणून. येते हं आई.

**आई** : बरं, ये. ( प्रभा जाते. )

**अण्णा** : मास्तरांनीं शकूला कां थांबायला सांगितलं कोण जाणे! खरं म्हणजे गरज नाहीं. त्या पोरीला काय कळतंय् त्यांतलं ?

**आई** : असेल कांहीं विचारायचं.

**अण्णा** : तेंच काय? ( पोस्टमन पत्र आणून टाकतो. अण्णा पत्र उघडून वाचतां वाचतां ) अहो, ऐकलंत का ? हें पाहिलंत का ?

**आई** : काय आहे त्यांत ?

**अण्णा** : ' होकार ' आलाय् त्यांच्याकडून.

**आई** : मीं सांगितलं नाहीं आपली शकू नक्की पसंत पडेल त्यांना !

**अण्णा** : असं प्रत्येक आईला वाटतं !

**आई** : असूं दे...आपली शकू भाग्याची आहे यांत शंका नाहीं.

**अण्णा** : प्रश्नच नाहीं! हें लग्न जमलं आतां. तुम्ही कांहीं काळजी करूं नका. मघाशीं जें कांहीं बोललों ना, तें...तें उगाच बोललों. शकूचं लग्न आपण झक्कपैकीं करूं. देण्याघेण्यावरून फिसकटूं नाहीं देणार मी. इकडचं जग तिकडे करीन, पण बैठक मोडूं देणार नाहीं मी. इतरांना पोरीचं लग्न जमवतांना जोडे झिजवावे लागतात. माझ्या घरीं स्थळ चालून आलं. पोरीच्या जन्माचं कल्याण होत असेल तर मला हें सारं व्यवस्थित केलं पाहिजे.

**आई** : एवढा काय आनंद झालाय् ? मघाशीं किती काळजींत बुडून गेलां होतां !

**अण्णा** : काळजी करायची असते आधीं आणि नंतर; दरम्यान करायची फक्त धडपड. तुम्ही कांहीं काळजी करूं नका. सारं व्यवस्थित करीन मी.

**आई** : मास्तरांना बैठकीला बोलवायला हवं.

**अण्णा** : अर्थात्...एवढं का कळत नाहीं मला ?

**आई** : तसं नाहीं; आपलं सुचवलं.

**अण्णा** : पोरीचं लग्न झालं कीं डोक्यावरची जबाबदारी गेली. कर्ज काय, फिटतील. माझ्या अंगांत अजून आहे धमक.

**आई** : देवापुढं साखर ठेवून येतें. शकूला खूप आनंद होईल, नाहीं ?

**अण्णा** : व्हायलाच पाहिजे. जांवई आवडला की नाहीं तुम्हांला ?

**आई** : लग्न व्हायचंय् अजून.

**अण्णा** : तें काय, होईल. पण जांवयाच्या बाबतींत सासूची पसंती महत्त्वाची. काय, पसंत ना जांवई ? आतां शकू आली ना– कीं... ( दारांत शकू उभी ) शकू... अग, तुला उशीर होणार होता ना ?

**शकू** : हो, पण सर म्हणाले मी घरींच येतों....समक्ष भेट झाली कीं बरं ...त्यांच्याबरोबर...

**आई** : ते पण आले आहेत कीं काय ?

**शकू** : ते ? तुम्हांला कसं कळलं ?...

**अण्णा** : आम्हांला कसं कळलं.. अग, पत्र आलंय् त्यांचं...

**शकू** : पत्र ? ( गोंधळलेली ) घरीं ?

**आई** : अग 'होकार' आलाय त्यांचा.

**शकू** : होकार..., म्हणजे...

**आई** : अग, असं काय करतेस ? कव्यींचा होकार आलाय् तुला. आतांच पत्र आलं. ( शकू गप्प ) तेच आहेत ना मास्तरांच्याबरोबर ?

**शकू** : नाहीं...

**अण्णा** : मग कोण आलंय् दुसरं ?

[ दारांत मास्तर आणि चित्रपटनिर्माते राजशेखर उभे ]

**मास्तर** : या ना...( आई आंत जातात...अण्णांना ) आज तुमच्याकडे मी एक पाहुणे घेऊन आलोंय्...

**अण्णा** : या, बसा ना... ( मास्तर आणि राजशेखर बसतात. )

**मास्तर** : आधीं ओळख करून देतों. हे अण्णासाहेब भावे. माझे स्नेही. आणि हे राजशेखर, सुप्रसिद्ध चित्रपटनिर्माते. यांचे वडील आणि मी शाळेंत बरोबर शिकत होतों.

**मास्तर** : आज मी यांना मुद्दाम तुमच्याकडे घेऊन आलोंय.

**अण्णा** : अस्सं...छान !

**मास्तर** : परवां शाळेच्या गॅदरिंगला हे प्रमुख पाहुणे होते.

**अण्णा** : अस्सं, छान !

**मास्तर** : यांनीं शकुंतलेला खास बक्षीस दिलं अभिनयाचं.

**राज०** : त्यांत काय मोठंसं ? कलेची जाण आम्हीं नाहीं करायची तर कुणीं ? झांशीच्या राणीचा तुमच्या मुलीच्या प्रवेश...सुपर्ब...काय अभिनयाची समज... वंडरफुल...आणि सारं जिवंत... रिअली वंडरफुल... स्क्रीनलाहि चेहरा चांगला आहे त्यांचा.

**अण्णा** : माझ्याकडे काय काम आहे तें नाहीं समजलं.

**मास्तर** : हे एक ऑफर घेऊन आले आहेत.

**अण्णा** : ऑफर...? कसली ?

**राज०** पिक्चरची...हिरॉइनचा रोल आहे...

**अण्णा** : माफ करा... पण माझ्या मुलीला सिनेमांत नाहीं पाठवायचं मला... शिवाय तिचं लग्नहि ठरलंय्...

**मास्तर** : लग्न ?

**अण्णा** : कव्यींकडचा होकारहि आला तिला...

**मास्तर** : छान... फारच छान... ( राजशेखरना ) मीं तुम्हांला आधींच सांगितलं होतं कीं नाहीं– जमायचं. पण तुमचा आग्रहच पडला म्हणून तुमच्या-बरोबर आलों.

**राज०** : माफ करा... पण मला वाटतं, तुमच्या मुलीला आलेली एक सुवर्णसंधि... तुम्ही तिच्याकडे पाठ फिरवतां आहांत... तिच्या अंगांतल्या असामान्य कलेला कोंडून ठेवतां आहांत. हें खरं नाहीं... अशी संधि पुन्हां पुन्हां येत नाहीं. शिवाय नुसती संधीच देत नाहीं... बरोबर पैसाहि देतोंय् मी. पांच हजार रुपये रोख ॲडव्हान्स देईन मी.

**अण्णा** : ( नकळत ) पांच हजार रुपये...

**राज०** : आणि पांच हजार पिक्चर संपल्यावर. मला वाटतं माझी ऑफर रीझनेबल आहे...

**अण्णा** : पैशाचं नाहीं म्हणत मी. पण मुलीला सिनेमांत पाठवायचं म्हणजे... तिथलं वातावरण... मास्तर, मला कांहींच सुचत नाहीं.... तुम्ही काय केलं असतं अशा परिस्थितींत ?

**मास्तर :** हा प्रश्न निरर्थक असतो. वेळ आली कीं माणूस वेगळंच कांहीं तरी करतो. प्रश्न आहे तुम्ही आतां काय करणार आहांत ?

**अण्णा :** मीं काय करावं असं तुम्हांला वाटतं ?

**मास्तर :** तुम्हीं विचार करून निर्णय घ्यावा, एवढंच. तिच्या अंगांत कला आहे यांत वादच नाहीं. विद्वत्ता व्यासंगानं येते, पण कला मुळांत ' टॅलेंटस् '... असल्याशिवाय नाहीं येत.

**राज० :** राइट यू आर...

**अण्णा :** तरीहि... सिनेमांतलं वातावरण...

**राज० :** तुम्हांला वाटतं तितकं वाईट नसतं... सिनेमांतले सगळेच दारूबाज किंवा बाईच्या मागून धावणारे नसतात. स्पष्ट बोलतों, माफ करा...

**अण्णा :** पण अपवाद थोडेच...

**राज० :** म्हणजे मुळांत चांगला असलेला माणूस चांगला राहूं शकतो. हवं तर तिच्याबरोबर प्रत्येक वेळीं घरचं कुणी तरी पाठवा...

**अण्णा :** मला... मला विचार करायला हवा...

**राज० :** मला चार दिवसांनीं कळवा... माझी घाई नाहीं.

**अण्णा :** पण बहुतेक जमायचं नाहीं असं वाटतंय्...

**राज० :** चार दिवस थांबतों मी... एवढी घाई कशाला करतां ?

**अण्णा :** ठीक आहे...

**राज० :** ही भूमिका असामान्य आहे. तुमची मुलगी ती उत्कृष्ट करूं शकेल. एका रात्रींत कीर्तीच्या शिखरावर जाऊन बसेल... तुम्ही या साऱ्यांचा विचार करा... बस्स... येतों मी... चलतां ना मास्तर... ?

**अण्णा :** चहा तरी घेऊन जा.

**राज० :** तुम्हीं होकार दिलात ना कीं चहा मिळाला आम्हांला ! ओ. के. ! तुम्हांला माझ्यामुळं उशीर झाला मास्तर. तुम्हांला मी गाडीनं घरीं सोडतों... चला.

**मास्तर :** निघूं मी... ?

**अण्णा :** बरं...

**मास्तर :** मग कळवा तुमचा निर्णय. अगदीं तुमच्या इच्छेप्रमाणंच निर्णय घेऊन कळवा. येतों. ( दोघे जातात... क्षणभर स्वब्धता )

**बाबू :** ( प्रवेशून ) आतां आपल्याकडे राजशेखर कशाला आले होते ?

**अण्णा :** तूं ओळखतोस त्यांना ?

**बाबू :** हो... कां ?

**अण्णा :** कसा आहे माणूस ?

**बाबू :** पैसेवाला आहे. पण ते आले होते कशाकरितां ?

**अण्णा :** कशाकरितां नाहीं.

**बाबू :** शक्यच नाहीं. उगाच यायला फालतू माणूस नाहीं तो.

**अण्णा :** ( अनिच्छेनें ) शकूला सिनेमाची ऑफर घेऊन आले होते.

**बाबू :** काय...... ? खरं....... ?

**अण्णा :** हो....

**बाबू :** मग तुम्हीं काय सांगितलं... ?

**अण्णा :** माझा निर्णय ठरलेला आहे...ती सिनेमांत काम करणार नाहीं.

**बाबू :** तसं कळवलंत त्यांना... ?

**अण्णा :** नाहीं; पण तसं कळवणार आहें.

**बाबू :** मग माझं ऐका. तुमचा निर्णय चुकीचा आहे अण्णा. शकूनं सिनेमांत काम करायला हवं.

## दृश्य तिसरें

[ **दृश्य** : तेंच... **काळ** : चार दिवसांनंतर. **वेळ** : संध्याकाळची. शकू शाळेंतून येते. ]

( स्वयंपाकघरांतून आई येतात. )

**आई :** तूं होय ? मला वाटलं हेच आले.

**शकू :** कुठं गेले आहेत अण्णा... ?

**आई :** ( टाळत ) अजून कसे आले नाहींत...

**शकू :** तुला काय वाटतं आई, मला कळत नाहीं... ?

**आई :** काय ग... ?

**शकू** : माझ्या प्रश्नाचं उत्तर तुला द्यायचं नाहींये... नको देऊंस... मग तर झालं...? मी नाहीं विचारणार...

**आई** : असं नाहीं शकू, तुला कशाला उगाच त्रास ?

**शकू** : तूं सांगितलं नाहींस तर मला जास्त त्रास होईल, आई...

**आई** : अग, तुझ्या लग्नाचं जमत आलंय् ना. पुढच्या आठवड्यांत बैठक-सुद्धां होईल. जुळवाजुळव करायला नको ?

**शकू** : जुळवाजुळव का जमवाजमव ! ( थांबून ) कर्जाशिवाय लग्न होऊंच शकणार नाहीं का माझं ?

**आई** : तुला माहीत आहे सारं शकू...

**शकू** : माहीत आहे म्हणूनच वाईट आहे...स्त्रीचा जन्मच वाईट, नाहीं आई ? आयुष्यभर भार दुसऱ्याला...

**आई** : शकू, तुला असं कधीं म्हटलंय् आम्हीं... ?

**शकू** : माझ्याविषयीं नाहीं म्हणत मी आई... असंच. मला अण्णांचे कष्ट पहावत नाहींत. आई...आई, अण्णांना निदान एक तरी सांग माझ्या वतीनं... देण्याघेण्यावरून फिसकटलं तरी हरकत नाहीं, पण उगाच भलतं कबूल करूं नका. लहानपणीं आई-वडिलांनीं काढलेल्या खस्ता दिसत नाहींत आणि आपल्या मोठेपणीं पण त्या त्यांना काढायला लागल्या कीं मात्र त्या पहावत नाहींत... ( डोळ्यांतलं पाणी लपवत... चेहऱ्यावर खोटं हंसूं आणते. ) आई, अग, सांगायचं राहिलं. हें घे;– ( पाकीट देते. )

**आई** : काय आहे ग त्यांत ?

**शकू** : आज बक्षीस-समारंभ झाला गॅदरिंगचा... हे बक्षिसाचे २१ रुपये.

**आई** : अग, मला कशाला ?

**शकू** : असूं दे. अण्णांना एक धोतरांचं पान घेऊन ये. माझ्या कमाईचं !

**आई** : अग पण...

**शकू** : मला कांहीं ऐकायचं नाहीं तुमचं. ( टेबलावरची वही घेत बाहेर जायला निघते. )

**आई** : अग, निघालीस कुठं ?

**शकू** : प्रभा थांबलीय् खालीं. तिला वही हवीय् गणिताची, देऊन येतें.

**आई** : मग वर का नाहीं आली ती ?

**शकू** : आणखी दोन–चार मैत्रिणी आहेत बरोबर... आलेंच मी वही देऊन. ( जाते. )

( क्षणभरानंतर अण्णा प्रवेश करतात. आई आंतून प्रवेश करते. अण्णा कपडे काढीत असतांना क्षणभर स्तब्धता. )

**आई** : ( न राहवून ) जमलं का कांहीं ?

**अण्णा** : नाहीं...

**आई** : ( निराश स्वरांत ) नाहीं ? मला वाटलं होतं निदान भाऊसाहेब तरी नाहीं म्हणणार नाहींत.

**अण्णा** : मलाहि तसंच वाटलं होतं. मोठ्या आशेनं विषय काढला त्यांच्याकडे. म्हटलं पोरीचं लग्न ठरतंय्. तुमच्या मदतीशिवाय माझे दुबळे हात तें पार पाडूं शकणार नाहींत. जास्त नाहीं, तीन-चार हजार...

**आई** : मग काय म्हणाले ते ?

**अण्णा** : प्रथम गप्प राहिले. मग म्हणाले, तीन–चार हजार मला जास्त नसले तरी तुम्हांला खूप जास्त आहेत. माझे पैसे फेडणार कसे, याचं कमींत कमी तुम्हांला पटणारं उत्तर द्या. मी पैसे देईन मग... पण माझ्याकडे उत्तर नव्हतं. [ बाबू प्रवेश करतो. ]

**आई** : आपण पैसे फेडले असते त्यांचे.

**अण्णा** : तेंच, कसे ? भाऊसाहेबांचं बरोबर होतं. कर्जं नुसतीं वाढत जातात, फिटत नसतात. जें फिटतं ते कर्जच नाहीं. ( बाबू कुत्सित हंसतो. ) हंसायला काय झालं तुला ?

**बाबू** : तुमच्या बोलण्याचं हंसूं आलं मला.

**अण्णा** : तेंच. त्यांत हसण्यासारखं असं काय आहे ?

**बाबू** : जें फिटतं तें कर्जच नाहीं ! आणि हें माहीत असूनसुद्धां तुम्ही कर्ज काढणार. कशासाठीं ?

**अण्णा** : शकूचं लग्न काय पैशाशिवाय होणार आहे ?

**बाबू** : पण मी म्हणतों, काय गरज आहे शकूचं लग्न इतक्या लवकर करण्याची ? तिचं काय लग्नाचं वय उलटून गेलंय ?

**आई** : मग काय तिला घोडनवरी करायची ?

**बाबू :** कुणीं सांगितलं तसं ? एका सिनेमांत काम केल्यावर ती कांहीं लगेच घोडनवरी होत नाहीं...

**आई :** बाबू...

**बाबू :** उगाच ओरडूं नकोस माई...सिनेमांत काम करणं म्हणजे पाप नाहीं, कीं कुणाचा खून नाहीं. तिला खुशाल सिनेमांत काम करूं दे... कांहीं बिघडत नाहीं. झालंच तर कांहीं तरी चांगलं होईल... तुम्हीं स्वतः हें पटवून घेऊन तिला पटवलं पाहिजे. नाहींच जमलं तुम्हांला तें तर मी निश्चित करीन तें. तिनं सिनेमांत काम केलंच पाहिजे.

**अण्णा :** शरम नाहीं वाटत असा सल्ला द्यायला ?

**बाबू :** मास्तरांना नाहीं हा प्रश्न विचारलात ?

**अण्णा :** मास्तरांनीं मला कोणताहि सल्ला दिला नाहीं.

**बाबू :** दिला नाहीं, सुचवला. अर्थ तोच. आणि त्यांत काय वाईट सांगितलं त्यांनीं ?

**अण्णा :** मुलीला सिनेमांत पाठवायची ? अरे, आपलं घराणं कोणतं ? आपली प्रतिष्ठा धुळीला मिळेल !

**बाबू :** सध्यां काय आपली प्रतिष्ठा शिखरावर आहे ! मुलीच्या लग्नाकरितां चार ठिकाणीं पैशांकरितां तोंडं वेंगाडतांना कुठं जाते तुमची घराण्याची प्रतिष्ठा ? थकलेलीं बिलं वसूल करण्याकरितां दाराशीं माणसं येतात तेव्हां पुढच्या महिन्यांत नक्की देऊं असं कुणाचाच विश्वास न बसणारं आश्वासन देतांना कुठं राहते तुमची घराण्याची प्रतिष्ठा ? कर्जबाजारी माणसाला घराणं नसतं; प्रतिष्ठा नसते. त्याला असतं फक्त कर्ज ! न फिटणारं, न संपणारं ! प्रतिष्ठा असते ती फक्त पैशाला !

**अण्णा :** मुलीनं सिनेमांत काम करून मिळवलेला पैसा नकोय् मला !

**बाबू :** तुम्हांला कर्जाचा पैसा चालतो, आणि हा नाहीं चालत ?

**आई :** म्हणून शकूला खुशाल सिनेमांत का पाठवायची ?

**अण्णा :** त्याशिवाय त्याला चैनींत कसं राहतां येईल ?

**बाबू :** तुम्हांला चैन नको आहे ? तुम्हांला सगळं हवंय् अण्णा. पण तें मला मिळालेलं नको आहे तुम्हांला. आयुष्यभर तुम्हीं हेंच केलंत. माझा राग, माझा द्वेष ! आणि मीहि तुमचा रागच केलाय्... माझी आई मेली नाहीं अण्णा;

तुम्हीं तिला मारलींत ! संसाराच्या खस्ता खात, कष्ट उपसत झिजून मेली ती ! तुमचं दारिद्र्य हा काय तिचा दोष होता ? ऐपत नव्हती तर कां लग्न केलंत...? माईनं कधीं सावत्रपणानं वागवलं नाहीं, पण तुम्हीं आपल्या सख्ख्या मुलाला सावत्र मुलासारखं वागवलंत. कां ? तर तुमचा मुलगा तुमच्यासारखाच सामान्य निघाला. आणि त्यानंहि आपल्यासारखंच कर्जांत बुडून जावं असं तुम्हांला वाटतं...

**अण्णा :** लाज नाहीं वाटत असं बोलायला ?

**बाबू :** मग कां नाहीं शकूला सिनेमांत पाठवत ?

**अण्णा :** तुझ्याकडून शहाणपण शिकायचं नाहीं मला !

**बाबू :** कां तुम्ही स्वतःच्याच मतांना चिकटून राहतां ?

**अण्णा :** मुलीला नटी नाहीं करायचं मला !

**बाबू :** नटी ?

**अण्णा :** मग काय कलावंतीण म्हणूं ?

**आई :** कसं बोलवतं तुम्हांला हें ?

**अण्णा :** कोणता प्रतिष्ठित मुलगा सिनेमांतल्या नटीशीं लग्न करील ?

**बाबू :** कां ? सिनेमांतल्या नटींशीं कुणी लग्न करीत नाहीं ?

**अण्णा :** प्रतिष्ठित माणसाविषयीं बोलतोंय् मी !

**बाबू :** काय व्याख्या आहे तुमची प्रतिष्ठेची ?

**अण्णा :** त्याविषयीं मला तुझ्याशीं चर्चा करायची नाहीं.

**बाबू :** प्रतिष्ठा, प्रतिष्ठा ज्याला म्हणतात ती पैशानं विकत मिळते अण्णा !

**अण्णा :** बस्स कर. तुला इतकं बोलूं दिलं हीच आमची मोठी चूक झाली. माझा निर्णय पक्का आहे.

**बाबू :** कर्जाऊ रक्कम उभी करतां आली असती तर निदान निर्णय समर्थनीय वाटला असता मला !

**अण्णा :** माझ्या वर्मावर बोट ठेवतोस ? तुझं आव्हान स्वीकारलंय् मीं. तुझ्यासारखा निष्क्रीय नाहीं मी. कांहीं करून शकूच्या लग्नाकरितां नाहीं रक्कम उभी केली तर नांव बदलून देईन मी !

**बाबू :** कशाला इतकी जिद्द ? कशासाठीं ? आणि अण्णा, इरेला पडून तुम्ही पैसे उभे करालसुद्धां. कर्ज म्हणून ! तुमचं काय जातं? आयुष्यभर तें

फेडायला लागणार आहे मला. झिजावं लागणार आहे मला. असंच तुमच्या-सारखं. तडजोड म्हणून सामान्य नोकरी करावी लागणार आहे. परत तीच रड, तेच हाल, तेंच सारं ! हें दुष्ट वर्तुळ कधींच संपणार नाहीं ? कधींच संपूं नये ?

**अण्णा :** तुझी बहीण तुला जड झाली असली तरी मी बाप आहें तिचा. माझ्या स्वार्थाकरितां मी तिला नाहीं सिनेमांत पाठवणार. अण्णा भाव्यांची मुलगी सिनेमांत गेली हें नाहीं ऐकवायचं मला. माझा निर्णय कायम आहे.

**बाबू :** दरिद्री माणसाचे निर्णय कायम असतात ते बदलेपर्यंत. आणि आतां निर्णय कायम करायला तुमच्या हातांत राहिलाच नाहीं. शकूचा होकार मी राजशेखरना केव्हांच कळवून टाकलाय.

**अण्णा :** शकूचा होकार ?

**बाबू :** म्हणजे तुमचा होकार.

**अण्णा :** तुझ्या शब्दावर विश्वास ठेवायला तो माणूस दूधखुळा नाहीं.

**बाबू :** आणि हें न समजण्याइतका मीहि दूधखुळा नाहीं. तुमचा होकार मी लेखी कळवलाय् तुमच्या सहीनं.

**अण्णा :** शरम नाहीं वाटत असे धंदे करायला ?

**बाबू :** खरं सांगायचं ना अण्णा— तर नाहीं. बेशरम होऊन जितकं मिळवतां येतं त्याच्या किती तरी पटीनं खोट्या शरमेमुळं गमवावं लागतं.

**अण्णा :** हा गुन्हा आहे. तुरुंगांत खडी फोडायला जावं लागेल तुला.

**बाबू :** या गुन्ह्याबद्दल तुरुंगांत खडी फोडायला जावं लागणार नाही मला. तुम्हांला मला खडीच फोडायला पाठवायचं आहे ना ?— तीही संधि मी तुम्हांला देतों. पांच हजार रुपये रोख ॲडव्हान्स घेतले आहेत मी त्यांच्याकडून. तुमच्या सहीची पावती देऊन...

**अण्णा :** पण त्यांनीं दिले कसे ?

**बाबू :** कारण तुमची सही त्यांना माहिती नव्हती. पाठवा...पाठवा मला तुरुंगांत. माझं आव्हान आहे तुम्हांला. ज्या मुलाचा तुम्ही जन्मभर द्वेष केलात त्याला तुरुंगांत खडी फोडतांना पहा आणि सार्थक करा जीवनाचं. स्वतः सुखानं जगूं नका; दुसऱ्याला सुखानं जगूं देऊं नका. दारिद्र्याला मिठ्या मारणं हेंच

तुमच्या आयुष्याचे भोग असतील तर त्याला कोण काय करणार ? पण आम्ही का म्हणून ते भोग भोगावे ? माझा काय अपराध ? शकूचा काय अपराध ? तुमच्या दरिद्री घरांत जन्माला आलों हाच ना...( खिशांतून पैसे काढीत ) उचला, उचला हे पैसे. होळी करा ह्यांची तुमच्या प्रतिष्ठेवर. त्या धुरानं घुसमटून जा, पण ते पैसे स्वीकारूं नका... उचला, उचला ते चार हजार रुपये...

**अण्णा** : चार हजार रुपये ?

**बाबू** : एक हजार उडवलेत मी... तुमचींच छोटीं मोठीं देणीं भागवलीं आहेत.

**अण्णा** : मला खोड्यांत पकडण्याकरतां ?

**बाबू** : अर्थात्.

**अण्णा** : पण मी असा अडकणार नाहीं.

**बाबू** : असं ! काय करणार आहांत तुम्ही ?

**अण्णा** : रक्ताचं पाणी करून पै न् पै फेडीन मी त्यांची.

**बाबू** : तुमच्या या नपुंसक जिद्दीची चीड येते मला.

**अण्णा** : बस्स, हा विषय इथंच संपला. ( वेगानें आंत जाऊं लागतात. दारांत शकू उभी. ) शकू... शकू ... तूं... आम्ही...

**शकू** : मीं ऐकलंय् सारं अण्णा.

**अण्णा** : तुला त्रास झाला असेल या साऱ्याचा. पण...

**शकू** : त्रास ?

**अण्णा** : हें बघ शकू, तूं कांहीं मनावर घेऊं नकोस. बाबू जें कांहीं बोलला त्याला अर्थ नाहीं. मूर्खपणा होता तो. कर्ज काय, फिटतील. मी अजून काम करतोंय् ना... तुझं लग्न आपण छानपैकीं करूं. तुला कांहीं त्रास होणार नाहीं. पैशावरून कांहीं फिसकटणार नाहीं. माझी एकच मुलगी तूं. तुझ्या सुखापलीकडे आम्हांला कशाचीहि किंमत नाहीं. इतकं चांगलं स्थळ आम्ही हाताबाहेर नाहीं घालवणार. विश्वास ठेव माझ्यावर... ( स्तब्धता ) तुला खरं नाहीं वाटत शकू...

**शकू :** ( डोळे भरून येतात. ) तसं नाहीं अण्णा ... अण्णा, आई, आयुष्यभर किती हाल काढाल तुम्ही ?

**आई :** संवयीनं वाटत नाहीं त्याचं कांहीं......

**शकू :** तुम्हांला कांहीं वाटणार नाहीं. पण मला मात्र सुखाच्या आयुष्यांत खड्यासारखं तें कुठं तरी बोचत राहील. असं सुख मला नकोय्, अण्णा. थांबा... अण्णा, तुम्ही कांहीं बोलूं नका... मला बोलूं द्या... मी विचार करून बोलतेंय्. पूर्ण विचार करून. गेले चार दिवस मी झगडतेंय् स्वतःशींच. कारण हा निर्णय मला घ्यायचाय्, आणि मीं तो घेतलाय्. तुम्हां सर्वांना सुखांत ठेवायचं आहे मला, आणि म्हणून... म्हणून.... हें लग्न करायचं नाहीं मला.

**अण्णा :** पण शकू... बाबूनं पैसे घेतले म्हणून तर तूं...

**शकू :** नाहीं अण्णा, मी स्वखुषीनं विचारपूर्वक निर्णय घेतलाय्. जीवनाची चौकट कधीं तरी कुणीं तरी फोडायला हवी; तोडायला हवी. मी तोडणाराय् ती माझ्याकरितां, तुमच्याकरितां... कदाचित् यांतूनहि खूप चांगलं निर्माण होणार असेल... मला तुमची परवानगी हवीय्. आशीर्वाद हवे आहेत... सिनेमांत काम करायचं ठरवलं आहे मीं !

**आई :** शकू...

**अण्णा :** तें जग फसवं असतं, घाणेरडं असतं...

**शकू :** अण्णा, जगच मुळांत फसवं असतं, घाणेरडं असतं. पण तरीहि आपण जपून राहतोंय् ना ! तुमच्या पुण्याईवर तरून जाईन मी... बाबू... मास्तरांना कळव, कॉन्ट्रॅक्टवर सही करायला तयार आहें मी...

**बाबू :** कॉन्ट्रॅक्ट घेऊन आलोंय् मी... ( तिच्यासमोर कॉन्ट्रॅक्ट ठेवतो. ) इथं सही कर ( ती सही करीत असतानाच पडदा )

**अंक पहिला समाप्त**

# अंक दुसरा

## दृश्य पहिलें

[ सात वर्षांचा काळ उलटून गेला आहे. शकुंतलादेवी– एक यशस्वी नटी झाली आहे. तिच्या घरचा दिवाणखाना. उत्कृष्ट सजवलेला. वैभवाची आणि सौंदर्याची साक्ष पावलोपावलीं पटावी. सकाळची वेळ. दिवाणखान्यांत सोफ्यावर निर्माते रामलाल बसले आहेत पाइप ओढीत. बाबुराव, संपूर्णपणें बदललेला बाबू– जिना उतरून खालीं येतो. )

**बाबुराव** : रामलाल, किती वेळ झाला तुम्हांला येऊन ?

**रामलाल** : दहा मिनिटं.

**बाबुराव** : आय् ॲम सॉरी. तुम्हांला वाट पहायला लागली.

**रामलाल** : त्याची संवय असते आम्हांला.

**बाबुराव** : बोला...

**रामलाल** : कॉन्ट्रॅक्ट आणलंय् सही करायला.

**बाबुराव** : दॅटस् फाइन. त्याच्यापूर्वीं एक गोष्ट विचारायची आहे. स्टोरी-रायटरनं बाईंना हवा तसा रोल चेंज करून द्यायचं कबूल केलं कीं नाहीं... ? मीं सांगितलं होतं तसं...

**रामलाल** : कबूल झाला तो.

**बाबुराव** : त्याला सांगा... ध्येयवाद, कला या साऱ्या गोष्टी कागदावर ठीक आहेत. व्यवहारांत त्यांची किंमत शून्य. आणि हेंहि सांगा समजावून, पिक्चर्स चालतात तीं स्टोरी-रायटरच्या स्टोरीवर नाहीं, हिरॉइन्सवर... स्टुपिड. मला शिकवत होता !

**रामलाल** : फरगेट इट.

**बाबुराव** : पिक्चर स्टार्ट ऑगस्टमध्यें करणार आहांत, नाहीं ?

**रामलाल** : हो...

**बाबुराव** : दहा दिवसांचं फक्त एक शेड्यूल ती देऊं शकेल. तेंहि शेवटच्या आठवड्यांत.

**रामलाल** : ओह ! मी स्टुडिओ १ ते २० तारखेपर्यंत बुक केलाय्.

**बाबुराव** : मला विचारल्याशिवाय ?

**रामलाल** : तुम्हीं मला प्रोव्हिजनल डेट्स दिल्या होत्या...

**बाबुराव** : येस. प्रोव्हिजनल, फायनल नाहींत. आणि त्याहि परवां, तुम्ही दुसऱ्या दिवशीं नक्की सांगणार होतां. तुमचा फोन आला नाहीं. मीं तारखा देऊन टाकल्या.

**रामलाल** : बघा त्या कॅन्सल करतां आल्या तर. स्टुडिओचं भाडं पण मीं भरलंय्.

**बाबुराव** : हा माझा दोष नाहीं.

**रामलाल** : कबूल. पण जरा बघा अॅड्जस्ट करून.

**बाबुराव** : प्रयत्न करीन, नो प्रॉमिस.

**रामलाल** : ठीक आहे.

**बाबुराव** · पुढच्या वेळेला कन्फर्मड डेट्स असल्याशिवाय स्टुडिओ बुक करूं नका...आउट डोअर किती आहे ?

**रामलाल** : दोन शेड्युल्स्मध्यें आटपून टाकूं. पावसाळा संपल्यावर, डिसेंबर–जानेवारींत. त्याची काय आतां घाई नाहीं. मी सांगतों तुम्हांला हें प्रॉडक्शन हिट जाणार. ज्युबिली नक्की. आणि बाई असल्यावर काय ? ... काय ? बाई दिसत नाहींत कुठं ?

**बाबुराव** : कशासाठीं ?

**रामलाल** : कशासाठीं असं नाहीं. आलोंय् तर भेटून जाऊं.

**बाबुराव** : इतकंच ना ? भेटतील त्या. कॉन्ट्रॅक्ट साइन करायचंय् ना ?

**रामलाल** : बाईंचे सारे व्यवहार तुम्हीच बघतां. म्हणजे एकदां तुमच्याशीं बोलणं केलं कीं त्यांच्याशीं या बाबतींत निराळं बोलायला नको.

**बाबुराव** : नको. मी सांगतों तेंच अखेरचं. तारखा...पैसे, सगळ्या बाबतींत...बाय द वे– पैसे आणलेत ?

**रामलाल** : ते न आणतां कसा येईन ?

**बाबुराव** : ब्लॅकसुद्धां ?

**रामलाल** : आणले आहेत, पण जरा त्यांत थोडंसं...

**बाबुराव** : सॉरी; त्यांत कांहीं कमी व्हायचं नाहीं.

**रामलाल** : प्रॉडक्शन जरा खर्चाचं आहे,– म्हणून....

**बाबुराव** : सिल्व्हर ज्युबिली होणार आहे त्याची. बाई असल्यावर काय ? काय ? बरोबर कीं नाहीं... ?

**रामलाल** : नाहीं, तें होईल, पण...

**बाबुराव** : या मुद्द्यावर तडजोड नाहीं. सॉरी !...

**रामलाल** : बाईंना जरा...

**बाबुराव** : तिचा यांत संबंध काय ? सारे व्यवहार माझ्याकडे. मला पटवा तुम्हीं;– तिनं तुमच्याकडून कां कमी पैसे घ्यायचे ?

**रामलाल** : रोल फार चांगला आहे !

**बाबुराव** : अस्सं ? मग तुम्हीं जास्त पैसे द्यायला हवेत. तुमच्याकडून जास्त पैसे घेतले नाहींत ही सवलत मला वाटतं पुरेशी आहे.

**रामलाल** : ( निरुत्तर ) हें कॉन्ट्रॅक्ट...

**बाबुराव** : चंदर...( येतो. ) बाईंना सांग खालीं बोलावलंय्. प्रोड्यूसर रामलालजी आले आहेत...

**चंदर** : जी...[ जातो. ]

**रामलाल** : एक सांगायचं राहिलं, रात्रीं पार्टी अॅरेंज केली आहे. फायनान्सर, डिस्ट्रिब्यूटर, आणि इंडस्ट्रींतली कांहीं बडी मंडळी बोलावली आहेत. सिलेक्टेड. तुम्हीं पण यायचं.

**बाबुराव** : जरूर...

**रामलाल** : बाईंनाहि सांगा.

**बाबुराव** : बाईंना ? व्हेरी सॉरी, जमायचं नाहीं... शी इज बिझी.

**रामलाल** : पण माझ्या माहितीप्रमाणं आज त्यांना शूटिंग नाहीं.

**बाबुराव** : माहिती बरोबर आहे तुमची. पण तरीहि ती येऊं शकणार नाहीं.

**रामलाल** : मी त्यांना पर्सनली रिक्वेस्ट करीन.

**बाबुराव** : असं ? ठीक आहे. विचारूं शकतां. तिचा नकार तिच्याच तोंडून यावा ही कल्पना चांगली आहे.

( जिन्यावर शकुंतला उभी. संपूर्ण बदललेली. चित्रतारकेच्या झगमगाटाला शोभेशी. शांतपणें खालीं येते. )

**बाबुराव** : एक महत्त्वाचं विचारायचं राहिलं. नवीन अभिनेत्याला संधि द्यायचं खूळ काढून टाकलं कीं नाहीं डोक्यांतून ? कुणा तरी फालतू नटाबरोबर काम करण्याइतक्या बाई आतां नवख्या राहिल्या नाहींत.

**रामलाल** : हो, तें खरंच. कास्टिंग बदललंय्...

**बाबुराव** : कुणाला साइन केलंय् ?

**रामलाल** : उपेंद्रकुमार...

**बाबुराव** : ( चमकतो. ) कोण ? उपेंद्रकुमार ! नो ! इम्पॉसिबल !

**रामलाल** : त्याला साइनसुद्धां केलंय्...

**बाबुराव** : ( क्षणभर स्तब्ध ) आय् ॲम् सॉरी. बाई काम करूं शकणार नाहींत. कॉन्ट्रॅक्ट परत घेऊन जा...

**रामलाल** : पण कां ?

**बाबुराव** : कारणांची गरज काय तुम्हांला ? उपेंद्रकुमाराबरोबर बाई काम करणार नाहींत...

**रामलाल** : तुमच्या म्हणण्याप्रमाणं मीं साऱ्या गोष्टी बदलल्या. स्टोरी-पासून हीरोपर्यंत. आघाडीचा नायक मीं आणलाय् ... त्यांच्यांत काय कमी आहे ?

**बाबुराव** : एक्झॅक्टली...म्हणूनच मला तो नकोय्.

**रामलाल** : बाईंना पण ?

**बाबुराव** : बाईंना पण.

**रामलाल** : पण त्या स्वतः कुठं तसं सांगताहेत ?

**बाबुराव** : तिनं स्वतः तसं सांगायची गरज नाहीं.

**रामलाल** : माफ करा,– मला वाटतं तुम्ही मला अडचणींत टाकताहांत.

**बाबुराव** : पण खरं उलट आहे. तुम्ही स्वतःच अडचणींत शिरत आहांत !

**रामलाल** : कसा काय ?

**बाबुराव** : उपेंद्रकुमाराला कॅन्सल करा. ती काम करील.

**रामलाल** : पण उपेंद्रकुमार...

**बाबुराव** : पुन्हां तेंच. डिस्ट्रिब्यूटर्स पैसे देतात ते नटींच्या नांवावर, शकुंतलाबाईंच्या नांवावर. उपेंद्रकुमाराच्या नांवावर नव्हे...कॉन्ट्रॅक्ट परत घेऊन जा. निर्णय घ्या आणि मग सावकाश भेटा. मला घाई नाहीं.

**रामलाल** : ( निमूटपणें कॉन्ट्रॅक्ट उचलतो. ) ठीक आहे. बघतों मी काय करायचं तें. पण मला वाटतं तुमच्या आणखी कांहीं अटी नाहींत हें तुम्ही कन्फर्म करा. म्हणजे ठरलंच बाईंना. घ्यायचं तर पुन्हां भानगडी नकोत.

**बाबुराव** : त्याबद्दल निश्चिंत रहा.

**रामलाल** : बरं आहे. तुम्हांला कळवतों. येतों मी. ( जातो. )

[ क्षणभर स्तब्धता, बाबुराव शांतपणें शकुंतलाकडे येतो. ]

**बाबुराव** : आय् ॲम् सॉरी.

**शकू** : कशाबद्दल...?

**बाबुराव** : तुलादेखील त्या रामलालसारखीं कारणं वदवून हवीं आहेत ?

**शकू** : मला समजत नाहीं.

**बाबुराव** : तूं भोळी आहेस शकुंतला, आणि हुशारहि.

**शकू** : म्हणजे ?

**बाबुराव** : उपेंद्रकुमाराबरोबर तूं कधींहि यापुढं काम करूं शकणार नाहींस. तुझी त्याच्याशीं वागणूक साऱ्या इंडस्ट्रींत माहिती आहे. मला ती नसेल असा भलता गैरसमज तूं करून घेणार नाहींस. खरं म्हणजे इतकं पुढं जाऊं देण्यांत माझी चूक झाली. पण तो वेग मी थांबवूं शकलों नाहीं. पण तें मी आतां करणार आहें. पुढं कांहीं होण्याच्या आंत...

**शकू** : पुढं कांहीं ...?

**बाबुराव** : थोडक्यांत– लग्न !

**शकू** : पण त्यांत वाईट काय आहे ?

**बाबुराव :** इतकंच आहे– कीं तुझ्याकडे पैसा आहे.

**शकू :** पैशाकरितां माझ्याशीं लग्न करीत नाहींये तो.

**बाबुराव :** मग कशाकरितां ? तुझ्या सौंदर्याकरतां ? तुझ्या शरीराकरतां ? हें सौंदर्य तुला आयुष्यभर पुरणार नाहींये शकुंतला...

**शकू :** आयुष्यभर कुठलीच गोष्ट पुरत नाहीं ! पैसासुद्धां...

**बाबुराव :** मी पुरवीन...

**शकू :** माझा पैसा ? रक्ताचं पाणी करून मी पैसा मिळवतेंय्. कुणाकरतां ? तुझ्याकरतां ?

**बाबुराव :** होय. माझ्याकरतां... ( थांबून ) आणि तुझ्याकरितांहि. तुझं काय कमी केलंय् मीं...

**शकू :** उपकार नाहीं केलेस माझ्यावर. हें सारं माझं आहे. यापुढं मीं सिनेमांत नाहीं काम केलं तर...

**बाबुराव :** मी त्याची काळजी घेईन... तूं सिनेमांत काम करशील !

**शकुंतला :** मी सिनेमांत काम करणार नाहीं...

**बाबुराव :** मला धमकी देऊं नकोस.

**शकुंतला :** इतकंच नाहीं तर लग्न करीन...

**बाबुराव :** ( हंसतो. ) तुझ्याशीं कोण लग्न करील ? मी असतांना...

**शकुंतला :** तुला शरम नाहीं वाटत असं बोलायला...दुष्ट...जंगली... भेकड... !

**बाबुराव :** शट अप् !...

**शकुंतला :** मी ओरडणार... साऱ्या जगाला ओरडून सांगणार...

**बाबुराव :** शकुंतला...

**शकुंतला :** कीं यानं... यानं माझ्या आयुष्याचा... माझ्या साऱ्या साऱ्या...

**बाबुराव :** ( मुस्कटांत मारतो. ) ( क्षणभर स्तब्धता ) शुद्धीवर आलीस ? लक्षांत ठेव तूं...तूं...असं कधींच करूं शकणार नाहींस...कारण ( ती चमकून पहाते. ) समजलं ?...आणि एक लक्षांत ठेव, अंगावर ‘ अशा ’ रीतीनं हात

टाकणं मला आवडत नाहीं. ( वर जातो. शकुंतला एकटीच सुन्नपणें उभी. प्रभा येते. लग्न झालेली. संसारांत रमलेली. संसार मानवलेली. )

**प्रभा** : शकुंतला...

**शकुंतला** : ( वळते. क्षणभर डोळ्यांवर विश्वास नाहीं. ) प्रभा...? प्रभा... तूं ?... ( जवळ जाऊन मिठी मारते. ) प्रभा...ए, तूं नक्की प्रभाच ना ? ( खळखळून हंसते. ) किती गोड दिसतेस ग ! किती बदलली आहेस... ! मीं तुला ओळखलंच नाहीं बघ...

**प्रभा** : मला बाई तीच काळजी पडली होती...

**शकुंतला** : काय– मी तुला ओळखणार नाहीं ?

**प्रभा** : नाहीं; ओळख देणार नाहींस.

**शकुंतला** : प्रभा...

**प्रभा** : अशी रागावूं नकोस ग. मला आपलं वाटलं. म्हटलं आतां खूप मोठी झालीय् शकुंतला...

**शकुंतला** : अं ऽ हं... शकुंतला नाहीं...शकू म्हण...नुसतं शकू... वाटल्यास शके...शकडीसुद्धां...

**प्रभा** : कांहीं तरीच काय ? कुणीं ऐकलं तर...

**शकुंतला** : ए, सांग नं मला...तूं कुठं असतेस ? काय करतेस ? तुला मुलं किती ? मुलगा, मुलगी... सारं सारं सांग...

**प्रभा** : अग हो...हो...इतकीं वर्षं झालीं अजून आहेस तशीच आहेस शकू...

**शकुंतला** : शकू— सारं विसरायला होतं बघ या एका हांकेनं. आणि सारं आठवायला लागतं तेंहि याच एका हाकेनं. पूर्वींचं सारं... शाळा, आपले सर, मैत्रिणी, शाळेचीं गॅदरिंग...ती आपण बसवलेलीं छोटीं छोटीं नाटकं... अगदीं लहानपणीं आमच्या वाड्यांत मांडलेले भातुकलीचे खेळ...बाहुला-बाहुलींचीं लग्नं...लग्नं...तुझं लग्न कधीं झालं प्रभा... ? मला बोलावलं नाहींस ?

**प्रभा** : बोलावलं होतं. पत्रिका पाठवली होती.

**शकुंतला** : मिळाली नसेल...

**प्रभा** : मला तुझी खूप आठवण यायची शकू. तूं आतां मोठी झालीस... खूप मोठी झालीस. वैभव, कीर्ति...मला अभिमान वाटतो तुझा. मी सामान्य मुलगी. पण एक असामान्य मुलगी माझी बालमैत्रीण आहे हें सांगतांना कुठं तरी आनंदानं भरून येतं...तुला कल्पना नाहीं यायची...मला हेवा वाटतो तुझा.

**शकुंतला** : कट इट. ओ. के. फॉर मी...

**प्रभा** : काय झालं ग...?

**शकुंतला** : कांहीं नाहीं. हा सीन पुरे झाला आतां...

**प्रभा** : तुला कंटाळा आला... ?

**शकुंतला** : कंटाळा नाहीं बाई. इतक्या वर्षांनीं भेटली आहेस. उगाच स्तुति करायची नाहीं. मी विटलेंय् साऱ्याला. त्यापेक्षां तूं मला फर्स्ट क्लासपैकीं दोनचार शिव्या दे...म्हणजे साध्याच...म्हणजे देतांना तुला लाज वाटायला नको. स्तुतीचा कंटाळा आलाय् मला. सारखं देवीजी–बाईसाहेब, हॉं जी आणि हॉं जी.

**प्रभा** : इतकीं वर्षं झालीं पण तूं मुळींच बदलली नाहींस...

**शकुंतला** : असं ? मला वाटलं मी बदललेंय्. खूप बदललेंय्. (एकदम) तुझे केस एकदम पातळ झाले, नाहीं... ?

**प्रभा** : बाळंतपणानंतर कमी झाले.

**शकुंतला** : अय्या ! खरंच...ए, काय आहे...मुलगा की मुलगी... ?

**प्रभा** : मुलगा आहे; पांच वर्षांचा.

**शकुंतला** : छान असेल, नाहीं ? तुझ्यासारखाच गोड !

**प्रभा** : ए, खरंच छान आहे तो ! त्याला काम देशील का ग तुझ्या सिनेमांत ?

**शकुंतला** : सिनेमांत ? त्याला... तुझ्या त्या छान गोंडस मुलाला ? शीः ! शीः ! प्रभा, हें एवढं सोडून दुसरं कांहींहि माग.

**प्रभा** : अग, मीं अगदीं सहज विचारलं.

**शकुंतला** : एकदां विचारलंस, पुन्हां विचारूं नकोस. सहजसुद्धां.

**प्रभा** : रागावलीस ?

**शकुंतला** : ए, रागवायच्या गोष्टी नकोत. कांहीं तरी दुसरं बोल ना. जुनं. मला नुसतं ऐकायचंय्. सारं विसरलेंय् मी. आठवायला वेळच नाहीं...

**प्रभा** : तूं खूप मोठी झालीस...

**शकुंतला** : मला आतां खूप लहान व्हायचंय्...ए...तुझ्या पिशवींत काय आहे ?

**प्रभा** : कांहीं नाहीं ग, भाजी आहे.

**शकुंतला** : (उघडून बघते) ओ, काकडी ! ए, मी खाऊं का एक... ?

**प्रभा** : खा नं...

**शकुंतला** : अग, असं कांहीं गेल्या कित्येक दिवसांत खाल्लंच नाहीं बघ... जेवण-खाणसुद्धां कलात्मक. स्टायलिश...आणि तेंहि पोटभर खायचं नाहीं... लोक हंसतील.. डिग्निटी कमी होते ना ? छान आहे हं काकडी ! ए...तूं रहायला ये ना माझ्याकडे एकदां...

**प्रभा** : रहायला ? नको बाई...

**शकुंतला** : कां ? सिनेनटीकडे रहायला लाज वाटते ?

**प्रभा** : तसं नाहीं ग. मीं एकटी थोडीच आहे ?

**शकुंतला** : ओ हो ! एका दिवसाच्या विरहानं तुमचे हे वाळणार आहेत कीं काय ? भारी बाई.. !

**प्रभा** : रहायचं जाऊं दे. पण मला तुझं शूटिंग बघायला मात्र एकदां यायचंय्. मजा असेल, नाहीं ?

**शकुंतला** : मजा ? अग, कंटाळून जाशील तूं...दहा मिनिटं तुम्ही जें पडद्यावर बघतां तें शूट करायला दहा तास लागतात.

**प्रभा** : कमाल आहे बाई !

**शकुंतला** : कंटाळवाणं आहे सारं...

**प्रभा** : ए शकू,...तुझा मीं एक सिनेमा मध्यें पाहिला...मला नाहीं बाई आवडला. काय तुझा पोषाख...शीः !...

**शकुंतला** : अग, आपल्या आवडीप्रमाणं थोडंच चालतं तिथं ? ए, त्याच पिक्चरच्या शूटिंगच्या वेळेला मला आपल्या शाळेची, तुझी खूप आठवण झाली ग. एक असाच डान्स टाकला होता त्याच्यामध्यें. कृष्ण–राधा, वगैरे वगैरे. आणि मग ना, शाळेंतल्या अगदीं लहानपणीं आपण केलेल्या नाचाची

आठवण झाली... तूं झाली होतीस कृष्ण, मी झालें होतें राधा... आणि तुला सारखं विसरायला व्हायचं बघ. मुरली डावीकडे धरायची कीं उजवीकडे ? आणि डावा पाय मोडायचा का उजवा पाय मोडायचा...(खळखळून हंसते.) आठवतं ना... कुठचं ग तें गाणं... हं. 'नको रे कृष्णा रंग उडवूं चुनरी भीजते ऽ ऽ' (दोघी एकदम म्हणतात.) 'मध्यरात्रीं चांदण्यांत थंडी वाजते, थंडी ऽ वाजते.' (दोघी खळखळून हंसत असतांनाच बाबुराव वरून खालीं येतो. शकुंतलेच्या चेहऱ्यावरचं हास्य मावळतं. चेहरा निर्विकार होतो.)

**शकुंतला** : (घाईघाईनं) ही माझी मैत्रीण प्रभा. निघालीच आहे आतां. तूं ओळखत असशील हिला. शाळेंत होती. आम्ही दोघी...

**बाबुराव** : नाहीं... !

**शकुंतला** : अच्छा ! मग आतां केव्हां येणार परत ? मी जरा बिझी आहें. पुढच्या वेळेला आपण शांतपणानं बोलूं. (प्रभा चक्रावलेली) ही तुझी पिशवी विसरली असतीस...

**बाबुराव** : मी क्लबवर जातोंय्....

**शकुंतला** : बरं...

**बाबुराव** : ॲण्ड बिहेव्ह युवरसेल्फ. (जातो.)

**प्रभा** : हा बाबूच ना ग ?

**शकुंतला** : नाहीं, बाबुराव...

**प्रभा** : मी निघतें आतां... पुन्हा येईन कधीं तरी...

**शकुंतला** : (थंडपणानं) बरं...

**प्रभा** : कधीं यावंसं वाटलं तर या आमच्याकडे...

**शकुंतला** : हो, जरूर... !

**प्रभा** : पण पत्ता माहीत आहे का ?

**शकुंतला** : काय ?

**प्रभा** : सौ. प्रभा कर्वे, केअर ऑफ – विश्वनाथ कर्वे...

**शकुंतला** : (दचकून) काय– विश्वनाथ कर्वे ?

**प्रभा** : हो, विश्वनाथ कर्वे; २६४ सदाशिव पेठ, पुणे २.

(ती पत्ता सांगत असतांनाच अंधार होतो.)

[illegible] २०००४ [illegible] २८।१०।८३

## दृश्य दुसरें

[ **काळ** : आठ दिवसांनंतर. **वेळ** : संध्याकाळची. दारावरील बेल वाजते. चंदर दार उघडतो आणि एका रुबाबदार तरुणाबरोबर प्रवेश करतो. ]

**चंदर** : बसा तिथं... बाईंना बोलावतों मी. कोण आलं आहे म्हणून सांगूं ?

**उपेंद्र** : उपेंद्रकुमार आले आहेत म्हणून सांग. ( चंदर वर जातो. )

( थोड्या वेळानें शकुंतला प्रवेश करते. )

**शकुंतला** : ( दुःखानं ) कशाला अलांत तुम्ही इथं ?

**उपेंद्र** : छान ! घरीं आलेल्या पाहुण्यांचं असं स्वागत करतात ?

**शकुंतला** : पाहुणा ?

**उपेंद्र** : कां ? ‘ पाहुणा ’ म्हटल्यानं परक्यासारखं वाटलं ?

**शकुंतला** : तसं नाहीं; पण...

**उपेंद्र** : मी आल्यानं तुला आनंद नाहीं झाला ? माझ्यावर राग आहे ? माझं कांहीं चुकलंय्... ? आतां बऱ्याच दिवसांत इकडे फिरकलों नाहीं, म्हणून जर कदाचित्...

**शकुंतला** : मीं तुमच्यावर रागावलें नाहीं.

**उपेंद्र** : खरंच... ?

**शकुंतला** : खरंच; तुमच्यावर मी रागावूंच शकणार नाहीं... कधींच...

**उपेंद्र** : हं... मग आतां वागतेयस त्याला काय अर्थ आहे... ?

**शकुंतला** : त्याला खूप मोठा अर्थ आहे...अनर्थाचा...

**उपेंद्र** : ए... चल, कांहीं तरीच काय बडबडतेस ?... तुझा मूड ठीक नाहीं... चल आपण जरा फिरून येऊं.

**शकुंतला** : माफ करा...मी नाहीं येऊं शकत...

**उपेंद्र** : असं? नाहीं येऊं शकत म्हणजे काय? मी हात धरून खेचत नेईन. अरे, म्हणजे आहे काय? एखाद्याला किती त्रास द्यायचा.. तूं फार छळतेस मला! ए बाई, आतां चल. पायां पडूं का तुझ्या... ? (हळूच) घरांत बाबुराव नाहीं ना?

**शकुंतला** : तुम्ही पण बाबुरावाला घाबरतां?

**उपेंद्र** : त्याचं माझं मुळींच पटत नाहीं. माहीत आहे तुला... काल रामलाल आले माझ्याकडे. मला समजलं सारं. बाबुरावानं त्यांना विचित्र अट घातली. उपेंद्रकुमार नायक असले तर शकुंतला काम करणार नाहीं. रामलालनं माझी मनधरणी केली, साइन्ड कॉन्ट्रॅक्ट कॅन्सल करावं म्हणून. तूं असल्याशिवाय त्याला फायनान्स मिळत नाहींये... मला त्याची परिस्थिति समजली... वाईट वाटलं... दिलं कॉन्ट्रॅक्ट सोडून. दुःख कॉन्ट्रॅक्ट सोडण्याचं नाहीं... तुझ्याबरोबर पिक्चरमध्यें काम करण्यांत जी मजा येते ना...खरं म्हणजे आज मी तुला भेटायला आलों नाहीं. बाबुरावला मी जाब विचारणार आहें. अर्थ विचारणार आहें या अटीचा...

**शकुंतला** : बाबुरावाला तुम्ही जाब विचारणार ?...

**उपेंद्र** : मी घाबरत नाहीं त्याला...

**शकुंतला** : तुम्ही ओळखत नाहीं त्याला.

**उपेंद्र** : मी त्याला चांगला ओळखून आहे, शकुंतला...

**शकुंतला** : असं तुम्हांला वाटतं ..

**उपेंद्र** : तो माझं काय करूं शकणार आहे ?

**शकुंतला** : तो काय करूं शकणार नाहीं ?...

**उपेंद्र** : असं ?

**शकुंतला** : तुम्ही इथं उगाच आलांत, उपेंद्र.

**उपेंद्र** : मी इथं उगाच नाहीं आलों. मला त्याला विचारायचं आहे...

**शकुंतला** : त्याचं उत्तर मी देतें. त्याला नसता धोका पत्कारायचा नाहीं—

**उपेंद्र** : धोका ? कशाचा ?

**शकुंतला** : त्याला मी तुमच्या सान्निध्यांत यायला नको आहे. म्हणून

त्यानं रामलालला तसं सांगितलं... आपला सहवास वाढणं धोक्याचं समजतो तो. यापुढं तुमच्याबरोबर कोणत्याच पिक्चरमध्यें काम करतां नाहीं यायचं मला.

**उपेंद्र :** अस्सं...?

**शकुंतला :** आपलं प्रेम माहीत आहे त्याला...

**उपेंद्र :** त्याविषयीं माझा कधींच गैरसमज झाला नव्हता... तुझ्यामाझ्याविषयीं काय बोललं जातं हें त्याला समजणार नाहीं अशा भलत्या कल्पनेंत नाहीं मी... आणि मला वाटतं त्याच्याविषयीं त्याची मान्यता आहे...

**शकुंतला :** मान्यता? खोटं आहे...

**उपेंद्र :** त्यानं कधींच अडवलं नाहीं आपल्याला...

**शकुंतला :** तितका मूर्ख नाहीं तो...

**उपेंद्र :** म्हणजे...

**शकुंतला :** तें पिक्चर शक्य तितक्या लवकर पूर्ण व्हावं अशी त्याची इच्छा होती. मागचं मागाहून बघतां येईल...

**उपेंद्र :** पण तूं काय करायचं, काय करूं नये हे ठरवणारा तो कोण?

**शकुंतला :** मी असहाय्य आहें...

**उपेंद्र :** तूं असहाय्य नाहींस...मी सोडवणाराय् तुला त्याच्या कचाट्यांतून. तुझ्याशीं लग्न करणार आहे मी...

**शकुंतला :** लग्न? तुम्ही भ्रमांत आहांत उपेंद्र...तुम्ही माझ्याशीं लग्न करूं शकणार नाहींत...कधींच शक्य नाहीं तें...

**उपेंद्र :** तुझं प्रेम नाहीं माझ्यावर?

**शकुंतला :** प्रेम? प्रेम म्हणजे काय? प्रेम या शब्दाचा अर्थच समजत नाहीं इतका हा शब्ददेखील मला परका झालाय्... प्रेम म्हणजे काय मला माहीत नाहीं उपेंद्र... झिजून झिजून गुळगुळीत झालाय् तो शब्द. मला प्रेम मिळालंच नाहीं. मी तें कुणाला देऊंच शकलें नाहीं. तर मला काय समजणार त्या भावनेचा अर्थ? मला माहीत आहे फक्त चित्रपटांतलं प्रेम, कोरडं, निर्जीव, थंड. प्रेमाचं मला माहीत नाहीं. पण तुम्ही मला आवडतां, तुमच्या

सहवासांत सुरक्षित वाटतं मला... यालाच प्रेम म्हणत असतील... तर माझं प्रेम आहे तुमच्यावर... मला तुम्ही हवे आहांत...

**उपेंद्र** : होय ना ? मग आपण लग्न करूं...

**शकुंतला** : कसं ?

**उपेंद्र** : आपण पळून जाऊं...

**शकुंतला** : कुठं... ? जाऊन जाऊन कुठं जाणार ? त्याचे हात फार लांब आहेत.

**उपेंद्र** : तूं उगाच घाबरतेस शकुंतला...

**शकुंतला** : उगाच... तुम्हांला कल्पना नाहीं... तुम्हांला कल्पना नाहीं... तुम्ही जा इथून... निघून जा.. आणि परत कधींच भेटूं नका... जा... जा... त्याला हें समजलं तर तो मारील मला. तुम्ही जा इथून...

**उपेंद्र** : मी इथून जाणार नाहीं.

**शकुंतला** : तुम्हांला जावं लागेल. मला त्याच्या कचाट्यांतून कोणीच सोडवूं शकणार नाहीं... उलट तुम्हीच त्याच्या कचाट्यात सांपडाल...

**उपेंद्र** : तो माझं काय वाकडं करूं शकणार आहे ? तूं हो म्हण, पुढची सारी व्यवस्था मी करतों... माझ्यावर विश्वास ठेव. मी तुला फसवणार नाहीं. ( ती गप्प आहे. तो तिच्या जवळ जातो. तिचा चेहरा आपल्याकडे फिरवतो. तिला जवळ घेतो... ) माझ्यावर विश्वास ठेव... विश्वास नाहीं माझ्यावर ? ( ती त्याच्या खांद्यावर मान ठेवते. दारांत बाबुराव शांतपणं उभा. तिचं अचानक त्याच्याकडे लक्ष जातं आणि ती झटक्यांत दूर होते. भयंकर घाबरलेली. उपेंद्र वळतो. बाबुराव शांतपणं पावलं टाकीत उपेंद्रकडे येतो. )

**बाबुराव** : माझ्या बहिणीच्या अंगावर हात टाकलात असं म्हणून मीं तुम्हांला आतां लाथा मारून बाहेर काढलं तर तें चूक ठरणार नाहीं. मला वाटतं तेंच योग्य आणि फायदेशीर ठरेल...

**शकुंतला** : बाबुराव...

**बाबुराव** : शट अप् !... रोमान्सचा सीन संपलाय् आतां.

**उपेंद्र** : आणि व्हिलनवरचा शॉट सुरू झालाय्.

**बाबुराव :** मी व्हिलन ? थँक्यू ! आणि आपण हीरो आहांत हें आपण सिद्ध करूं शकाल का ? मी तुम्हांला संधि देतों. माझ्या बहिणीच्या अंगावर तुम्हीं हात टाकलात...

**उपेंद्र :** त्याला हात टाकणं म्हणत नाहीत... हात ठेवणं म्हणतात. आणि अंगावर हात टाकायला ती कांहीं माझी बहीण नाहीं...

**बाबुराव :** ठीक आहे. तर त्याबद्दल मी तुम्हांला इथं, आत्तां, जन्माची याद राहील इतका मार देऊं शकतों...

**उपेंद्र :** शकाल. मी तुमच्या घरीं आहे.

**बाबुराव :** तुमच्या घरीं येऊनदेखील मी हेंच करूं शकतों. पहायचंय् ?

**उपेंद्र :** मला धमकी देतां ?

**बाबुराव :** दिलेली धमकी पुरी करूं शकतों मी.

**उपेंद्र :** मला मारून तुम्हांला काय मिळणार आहे ?

**बाबुराव :** चुकताहांत तुम्ही. मला त्यानं त्रास होतो— कांहींच मिळत नाहीं. पण तुम्हांला थोडी अक्कल यावी म्हणून... समजलं ?...

**उपेंद्र :** तुमच्या बहिणींच्या इच्छेविरुद्ध मी कांहीं तिला...

**बाबुराव :** हेंच मला तिच्या तोंडून ऐकायचं आहे... तिनं सांगावं तसं. मी सोडून देईन तुम्हांला...

**उपेंद्र :** सांग, शकुंतला सांग...

**शकुंतला :** नाहीं... नाहीं...

**उपेंद्र :** काय नाहीं... सांग...

**शकुंतला :** ( धीर एकवटून अडखळत ) त्यांत त्यांचा.. कांहींच दोष नाहीं... मीच.

**बाबुराव :** ( सरप्राइज्ड ) ओह... आय् सी...ठीक आहे...तुम्ही इथं आलां होतां कशाला ?

**उपेंद्र :** तुम्हांला भेटायचं होतं मला...

**बाबुराव :** मी नसतांना ? कुणाला भेटायचं होतं तुम्हांला ? मला कीं शकुंतलाला... ?

**उपेंद्र :** भेटावंसं वाटलं होतं शकुंतलाला. पण गरज होती तुम्हांला भेटायची...

**बाबुराव :** माझ्याकडे काय काम आहे तुमचं ?

**उपेंद्र :** तुम्हांला जाब विचारायचा आहे मला...

**बाबुराव :** मला आतांपर्यंत कुणीहि जाब विचारूं शकलं नाहीं.

**उपेंद्र :** पण मी विचारतोंय्.

**बाबुराव :** परिणामांची जाणीव ठेवून– का अविचारानं ?

**उपेंद्र :** तुम्ही माझं काय करूं शकणार आहांत ?

**बाबुराव :** ( हंसतो. ) यू आर ए ब्लडी फूल ! ओ. के. तुम्हांला काय विचारायचं आहे ?

**उपेंद्र :** शकुंतला माझ्याबरोबर काम करणार नाहीं अशी तुम्हीं रामलालना अट घातलीत...कां ?

**बाबुराव :** तो तुमचा प्रश्न नाहीं... तिनं कुणाबरोबर काम करावं हे ठरवायचा अधिकार तुम्हांला नाहीं.

**उपेंद्र :** तिनं कुणाबरोबर काम करायचं नाहीं हें ठरवायचा अधिकार तुम्हांलाहि नाहीं...

**बाबुराव :** तिचे तुमच्याबरोबर वाढत असलेले संबंध मला पसंत नाहींत. माझ्या बहिणीचं नांव तुमच्याबरोबर घेतलं जाऊं नये असं मला वाटतं.

**उपेंद्र :** मला...मला ...आणि मला... तिला काय वाटतं याचा कधीं विचार केला आहे तुम्हीं ?

**बाबुराव :** मला गरज नाहीं त्याची...पर्वाहि नाहीं...

**उपेंद्र :** आमचं प्रेम आहे एकमेकांवर...

**बाबुराव :** तुमच्या तोंडी हे शब्द शोभत नाहींत... प्रेम... डॅम इट ! या फालतू गोष्टीसाठीं तिचं कला-जीवन बरबाद व्हावं हे मला सहन नाहीं व्हायचं...मला तुम्ही तिच्या आयुष्यांत यायला नको आहांत...तुमची सावली-देखील पडतां कामा नये तिच्यावर... आय् मस्ट स्टॉप इट. परत कधींहि तुम्ही तिला भेटतां कामा नये. समजलं ! हे शेवटचं... आणि ही पोकळ धमकी नाहीं.

**उपेंद्र** : प्रवाहाला अडवूं शकणार नाहीं तुम्ही...

**बाबुराव** : असं ? पण प्रवाहाला वळवूं शकेन मी...

**उपेंद्र** : किती दिवस तिला गुलामींत ठेवाल... ?

**बाबुराव** : किती दिवस म्हणजे ?

**उपेंद्र** : कधीं तरी लग्न होईलच ना तिचं !

**बाबुराव** : ( स्तब्धता ) तुम्हांला लग्न करायचंय् तिच्याशीं... ?

**उपेंद्र** : मला वाटतं हें स्पष्ट सांगायची गरज नाहीं...

**बाबुराव** : तिलाहि तुमच्याशीं लग्न करायचं आहे... ?

**उपेंद्र** : निश्चित...

**बाबुराव** : तिनं जर असं सांगितलं तर माझी हरकत नाहीं. तिची हिम्मत असेल तर तिनं स्पष्ट सांगावं तसं...

**उपेंद्र** : शकुंतला...

**शकुंतला** : नाहीं... नाहीं... मला लग्न करायचं नाहीं... मला लग्न करायचं नाहीं...

**उपेंद्र** : शकुंतला...

**बाबुराव** : ऐकलंत ? झालं समाधान ?

**उपेंद्र** : ऐकलं, पण समाधान नाहीं झालं; हें खरं नाहीं.

**बाबुराव** : मग काय खरं आहे ?

**उपेंद्र** : तिला माझ्याशीं लग्न करायचं आहे हेंच खरं आहे.

**बाबुराव** : तिनं तसं सांगितलं नाहीं.

**उपेंद्र** : सांगण्याची हिम्मत नाहीं तिच्यांत.

**बाबुराव** : कुणी अडवलंय् तिला ?

**उपेंद्र** : ( हंसतो. ) उत्तर माहीत असलेला प्रश्न मला विचारतां ?

**बाबुराव** : यू शट अप ! तिला तुमच्याशींच लग्न करायचंय् हें तुम्हांला कुणी सांगितलं ?

**उपेंद्र** : हें सांगायला शब्दांची गरज नाहीं. स्पर्श शब्दांशिवाय खूप सांगतो.

**बाबुराव** : ( शांतपणें त्याच्याकडे येत ) तुम्ही स्टुडिओमध्यें सेटवर नाहीं,

आणि आयुष्यांत सिनेमांतले डायलॉग्ज उपयोगी पडत नाहींत. विल यू नाउ गेट आउट ?

**उपेंद्र** : नो...

**बाबुराव** : नो ? लक्षांत ठेवा, मी फार वाईट माणूस आहे... !

**उपेंद्र** : तसं असेल, नाहीं म्हणजे आहेच, तर मीहि फारसा चांगला नाहीं.

**बाबुराव** : माझ्याशीं वैर जड जाईल तुम्हांला...

**उपेंद्र** : मला ज्या गोष्टी जड जातील त्या तुम्हांलाहि सोप्या जाणार नाहींत.

**बाबुराव** : माझ्या खिशांत सदैव पिस्तूल असतं...

**उपेंद्र** : पण आतां त्याचा उपयोग करण्याइतके तुम्ही मूर्ख नाहीं...शिवाय पिस्तूल बाळगायला लायसेन्स लागत असलं तरी तें वापरायला धैर्य लागतं...

**बाबुराव** : तें धैर्य माझ्याजवळ नाहीं असं तुम्हांला वाटतं ?

**उपेंद्र** : निश्चित.

**बाबुराव** : तुम्ही फार बोलतां आहांत.

**उपेंद्र** : कारण मी तुम्हांला घाबरत नाहीं...

**बाबुराव** : हा मीं चॅलेंज समजायचा काय ?

**उपेंद्र** : चॅलेंज पुढंच आहे... शकुंतलेशीं मला लग्न करायचंय्... आणि त्याला तीहि तयार आहे...

**बाबुराव** : बरं मग... ?

**उपेंद्र** : मग काय ? मी तिच्याशींच लग्न करणार आहें.

**बाबुराव** : हाच चॅलेंज ?

**उपेंद्र** : येस...हाच चॅलेंज...तुम्ही तिला अडवूं शकणार नाहीं...आमचं लग्न कुणीच थांबवूं शकणार नाहीं.

**बाबुराव** : ( हंसतो. ) ओ. के. यू फूल गो अहेड... थॅंक्यू व्हेरी मच. मला सावध केलंत.

**उपेंद्र** : त्यांतूनच मला बेसावध क्षण मिळेल...

**बाबुराव** : तेंच दिसेल... बेसावध क्षण कुणाला मिळेल तें... यू गेट आउट...

**उपेंद्र** : मी चाललों आहें...शकुंतला, येतो मी... [ जातो. ]

**बाबुराव :** [ बाबुराव शकुंतलेकडे येतो. ] इथपर्यंत तुमची मजल आली हं...तुला लग्न करायचंय् त्याच्याशीं ? लग्न करायचंय्... ?

**शकुंतला :** नाहीं...

**बाबुराव :** तुझ्या इच्छेविरुद्ध त्यानं तुला जवळ घेतलं का या प्रश्नाचं उत्तरं देतांना आज तूं माझ्यावर उलटलीस... एकदां सोडून देतों मी. परत हें झालं तर जड जाईल...

**शकुंतला :** मी चुकलें...

**बाबुराव :** त्याचा विचार काढून टाक. कायमचा. तुझी काळजी घ्यायला, तुला हवं—नको तें द्यायला मी समर्थ आहें...

( फ्रीजमधून बाटली काढतो. शकुंतला वर जायला निघते. )

कुठं चाललीस...बैस इथं...आज घे माझ्याबरोबर...

**शकुंतला :** मला नको...जळजळत जाते ती...

**बाबुराव :** साल्यानं डोकं फिरवलं माझं... आज मी पिणार आहें... खूप पिणार आहें.— आणि तुलाहि प्यायली पाहिजे.

**शकुंतला :** मला नको सक्ति करूं...

**बाबुराव :** घे तूं. तुझंहि चढलेलं डोकं उतरेल...दारू चढायला लागली कीं डोकं उतरतं, आणि दारू उतरायला लागली कीं डोकं चढतं...घे तूं. आज जर तूं माझ्याबरोबर घेतली नाहींस...माझ्याइतकी, तर मी तुला...

**शकुंतला :** ( ग्लास तोंडाला लावते. ) ( अंधार )

## दृश्य तिसरें

[ आठ दिवसांनंतर वेळ सायंकाळची. फोनची बेल वाजते. ]

**बाबुराव :** (वरून खालीं येतो. फोन उचलतो.) येस्, मी बाबुराव... कुठची डेट, कुणी दिली तुम्हांला डेट...बाईंनीं...हें पहा, तें फर्स्ट क्लासचं तिकिट कॅन्सल करून टाका...याचा अर्थ ? याचा अर्थ इतकाच...बाई काम करणार नाहींत...डेट कॅन्सल करा...मानापमान असेल नाहीं तर स्वयंवर

असेल, मला काय त्याचं...हो, बाईनीं दिलेल्या डेट्स बाईवर बंधनकारक नसतात. फक्त मीं दिलेल्या डेट्स...नाटक कॅन्सल करा...तुमच्या मूर्खपणाची किंमत तुम्हांला द्यायलाच हवी...(फोन आदळतो) शकुंतलाऽ...शकुंतलाऽ...

**शकुंतला :** (शकुंतला खालीं येते.) मला न विचारतां तारीख देणारी तूं कोण ?

**शकुंतला :** कोणती तारीख... ?

**बाबुराव :** मानापमानाच्या प्रयोगाची...

**शकुंतला :** ती तारीख... ?

**बाबुराव :** येस्...तीच तारीख...

**शकुंतला :** पण ती तारीख मोकळी होती...

**बाबुराव :** तें ठरवणारी तूं कोण ? मला विचारलंस... ?

**शकुंतला :** तूं इथं नव्हतास...त्याला मी काय करूं... ?

**बाबुराव :** तारीख नाकारायची ! स्वतःला समजलीस कोण तूं... ?

**शकुंतला :** काम मला करायचं आहे....

**बाबुराव :** पण तें ठरवणार मी...डेट कॅन्सल करून टाकली मीं.

**शकुंतला :** पण त्यांचं किती नुकसान होईल... !

**बाबुराव :** खड्ड्यांत गेला तो कॉन्ट्रॅक्टर...काय देणं लागतों कीं काय मी त्याचं...प्रयोग रद्द करायला सांगितलाय् मीं त्याला...

**शकुंतला :** पण माझ्यामुळं त्याला कां शिक्षा... ?

**बाबुराव :** या वेळेला तुला करायची नाहीं म्हणून...

**शकुंतला :** निदान या खेपेला काम करूं दे मला...

**बाबुराव :** नाहीं म्हणजे नाहीं....

**शकुंतला :** पण कां...? मी गुलाम आहें तुझी... ?

**बाबुराव :** जास्त बोललीस तर थोबाड फोडीन...च्यायला मधल्यामध्यें कांहीं तरी गोष्टी करायला हव्यात...

**शकुंतला :** पण मी...

**बाबुराव :** चूप...! (दारावरची बेल वाजते.) वर जा... (शकुंतला

जाते. बाबुराव दार उघडतो. राजशेखर येतात. ) या...या...या...आज इकडे कुठं... ?

**राज०** : आज येणारच होतों...विसरलांत कीं काय ?

**बाबुराव** : आज-काल तुम्हीं येणं-जाणं कमी केलंत...

**राज०** : दोन-दोन पिक्चर्स चालू होतीं. वेळ मिळत नाहीं.

**बाबुराव** : साहजिक आहे...अरे चंदर... अरे चंदर...[ चंदर येतो. ] बाईंना बोलाव. राजशेखर आले आहेत... [ चंदर जातो. ]

**राज०** : पुढच्या महिन्यांत शूटिंग चालू करतोंय्...

**बाबुराव** : पुढच्या महिन्यांत ती मोकळी आहे. सगळ्या डेट्स तुमच्या... कांहीं गेल्या असल्या तर त्यासुद्धां कॅन्सल करूं...तुमच्याकरितां आम्ही काय नाहीं करणार...

[ शकुंतला येते. ]

**शकुंतला** : नमस्कार.

**राज०** : नमस्कार...तुमच्या मागच्या महिन्यांत रिलीज झालेल्या पिक्चरची खूप तारीफ ऐकली...तुमचं काम लाजवाब झालं आहे. आणि उपेन्द्रकुमारचंसुद्धां...तुम्हांला कळलंच असेल...( बाबुराव निर्विकार )

**शकुंतला** : काय... ?

**राज०** : काय ? तुम्हांला माहीत नाहीं ? उपेन्द्रकुमारला परवां ॲक्सिडेंट झाला. जागच्या जागींच ठार झाला. (शकुंतला शॉक्ड) तुम्हांला माहीत कसं नाहीं. आश्चर्य आहे ! घाटांत कार-ॲक्सिडंट झाला. कसा झाला, केव्हां झाला कांहींच कळलं नाहीं. फार वाईट मरण आलं त्याला ! व्हेरी सॅड ! एक चांगला आर्टिस्ट गेला...मला वाटलं माहीत असेल तुम्हांला...

**शकुंतला** : मला माहीत होतं सारं...सारं माहीत होतं...तो गेला...

**राज०** : बाबुराव...तुम्हांला...

**बाबुराव** : वाईट झालं...! पण मरण आपल्या हातीं थोडंच असतं... ? शकुंतलाची आणि त्याची चांगली मैत्री होती...चांगला माणूस होता... चालायचंच. एक वाईट झालं...ज्यांचीं चित्रं अर्धीं पूर्ण झालीं होतीं ते प्रोडयुसर्स गेले बाराच्या भावांत...नशीब त्यांचं.

**शकुंतला** : माणसासारखं माणूस जातं...

**बाबुराव** : तें जायचंच असतं...पण त्याच्याबरोबर पैशासारखा पैसा जातो हें फार वाईट.. जाऊं दे. हा विषय संपवूं या आपण...तूं फार हळवी आहेस. आपण यांच्या नव्या पिक्चरचं बोलूं या.

**राज०** : स्टोरी पसंत पडली का बाईंना ?

**बाबुराव** : स्टोरी चांगली आहे....थोडेसे चेंजेस...

**राज०** : ते करतां येतील.

**बाबुराव** : खरं म्हणजे चेंजेससुद्धां करायला नकोत. पण आपले करायचे. स्टोरींत चेंजेस न करण्याबद्दल कुणीं आपल्याला ब्लॅक मनी दिला ना तर मला काऊचिऊची गोष्ट पण चालेल...

**राज०** : पण मला नाहीं चालायची.

**बाबुराव** : तुमची गोष्ट वेगळी...तुम्ही कलेवर जगूं शकतां...पण कलावंत नाहीं कलेवर जगूं शकत. तुम्ही आयुष्यभर पिक्चर्स डायरेक्ट करूं शकाल पण कलावंताला त्याच्या वांट्याला आलेल्या लहानशा कलायुष्यांत आयुष्याची तरतूद करायची असते. मी फक्त पैसा बघतों.

**राज०** : शकुंतलाबाई, तुम्हीं नाहीं तुमचं मत सांगितलं ?

**शकुंतला** : माझं कसलं मत ? पण मला ती गोष्ट फार आवडली. ती भाबडी, सात्विक, सोज्ज्वळ नायिका मला फार आवडली. जसं मला राहावंसं, व्हावंसं वाटतं ना तशी आहे ती. तिची शोकांतिका कुठं तरी काळीज फोडून गेली. जीव ओतून मी ती भूमिका रंगवीन.

**राज०** : बस्स ! आणखीन काय पाहिजे ? हें पिक्चर गाजणार. तुमची भूमिका पण अप्रतिम होईल ! लेखक जरा नवीन आहे. पण त्याच्यांत स्पार्क आहे. तो शाइन होईल पुढं.

**बाबुराव** : कोण आहे लेखक ?

**राज०** : कर्वे... विश्वनाथ कर्वे.

**शकुंतला** : ( दचकते. ) विश्वनाथ कर्वे ? विश्वनाथ कर्वे... ?

**बाबुराव** : ( संशयानं ) तूं ओळखतेस त्यांना ?

**शकुंतला** : होऽ .. नक्की तेच ते...

**बाबुराव** : कोण ते ? तुझी ओळख आहे त्यांच्याशीं ?

**शकुंतला** : फार पूर्वीची. सात वर्षांपूर्वीची. मला पाहायला आले होते ते.

**बाबुराव** : अच्छा ऽ ! हा तो लेखक ?

**शकुंतला** : गोष्ट फार चांगली आहे, नाहीं ?

**बाबुराव** : ते आपण नंतर बघूं !

**राज०** : व्यवहाराचं...

**बाबुराव** : आम्ही तुम्हांला परके नाहीं मानत. व्यवहाराचं काय ? म्हणजे तें सगळं आपण व्यवस्थित करूं. आतांच काय घाई आहे त्याची ? मी दोन-चार दिवसांत फायनल कळवतों.

**राज०** : म्हणजे तुमचं नक्की नाहीं ?

**बाबुराव** : थोडंसं डळमळीत आहे. म्हणजे त्याचं काय आहे, बाकीच्या कमिटमेंट्स क्लॅश न होतां कसं काय जमतं तें बघतों. आणि चार-पांच दिवसांत फायनल कळवतों. ठीक आहे.

**राज०** : ठीक आहे. बाकीच्या गोष्टींची तुम्ही विशेष काळजी करूं नका. आपण घेऊं ॲडजस्ट करून. पण मला या रोलला बाईच पाहिजेत.

**बाबुराव** : बघूं कसं काय जमतंय् तें.

**राज०** : बरं, मी निघूं ?

**बाबुराव** : असं कसं... ड्रिंक्स वगैरे कांहीं...

**राज०** : पुढच्या वेळेला. आतां निघतों. दुसरी अपॉइंटमेन्ट आहे. म्युझिकचं फायनलाइज करायचं आहे. मी निघतों. प्लीज...

**बाबुराव** : ओ. के.

**राज०** : अच्छा, मी येतों. [ जातो... क्षणभर स्तब्धता. ]

**शकुंतला** : एकदम काय झालं ?

**बाबुराव** : कशाबद्दल ?

**शकुंतला** : त्यांना फायनल का सांगितलं नाहींस ?

**बाबुराव** : कारण उघड आहे...

**शकुंतला** : कोणतं ?

**बाबुराव** : चार दिवसांनीं नकार कळवणार आहे मीं त्यांना...

**शकुंतला** : नकार ?

**बाबुराव** : हो, नकार. या पिक्चरमध्यें काम करायचं नाहींस तूं.

**शकुंतला** : पण कां ? रोल चांगला आहे.

**बाबुराव** : रोलचा प्रश्न नाहीं यांत...

**शकुंतला** : मग कोणता प्रश्न आहे ?

**बाबुराव** : लेखकाचा...

**शकुंतला** : त्याचं काय ?

**बाबुराव** : विश्वनाथ कर्वे...तुला पहायला आलेला तरुण... ज्याच्यावर तूं एके काळीं भाळली होतीस... त्याला मनानं वरलं होतंस... तो... त्याची स्टोरी असलेल्या पिक्चरमध्यें तूं काम करायचं नाहींस...

**शकुंतला** : पण त्याचा काय संबंध येणार आहे ?

**बाबुराव** : मला रिस्क नाहीं घ्यायचं. सावध झालोंय् मी आतां...

**शकुंतला** : भलत्या गोष्टी गृहीत धरतो आहेस तूं ! कां ?...

**बाबुराव** : तुझ्या प्रत्येक ‘ कां ’चं उत्तर एकच आहे ... आणि तुला माहीत आहे तें...

**शकुंतला** : पण गोष्ट नाकारतांना कारण काय सांगणार आहेस ?

**बाबुराव** : उघड आहे, तुला गोष्ट पसंत नाहीं.

**शकुंतला** : पण त्यांना पटायचं नाहीं तें...

**बाबुराव** : न पटेना; मला काय करायचंय् त्याच्याशीं ? ( बाबुराव वर जायला निघतो. )

**शकुंतला** : मला आणखी एक गोष्ट विचारायची आहे...

**बाबुराव** : ( परत फिरत ) तुला आज कंठ फुटलेला दिसतोय्... बोल, काय ?

**शकुंतला** : उपेंद्रकुमारविषयीं.

**बाबुराव** : त्याचं काय ?

**शकुंतला** : त्याला कुणीं मारलं ?

**बाबुराव** : ( क्षणभर स्तब्ध ) तूं ज्या उत्तराची अपेक्षा करतेस तेंच खरं आहे. समजलं ? ( शकुंतला धक्क्यानं सोफ्यांत बसते. बाबुराव वळतो. )

**शकुंतला** : मला वेड कां लागत नाहीं ? मला वेड कां लागत नाहीं ?

( बाबुराव जिन्यावरून परत फिरतो... फ्रिझकडे येतो. दार उघडून बाटली काढतो. ग्लास भरून तिच्या तोंडाला लावीत असतांनाच अंधार... ... पडदा पडतो. )

**अंक दुसरा समाप्त**

# अंक तिसरा

## दृश्य पहिलें

[ सात वर्षांचा काळ पालटून गेला आहे. वैभवाच्या काळाचे उतरते दिवस. आतां पूर्वींचें कांहीं ' विशेष ' राहिलें नाहीं. वैभवाच्या आणि सौंदर्याच्या पुसट होणाऱ्या खुणा मात्र आहेत. **वेळ** : सायंकाळची. दिवाणखान्यांत फ्लशचा डाव रंगांत आलेला आहे. बाबुराव, शकुंतला आणि फिल्म लाइनींतलीं चार माणसं यांचं ' टेबल ', कॉइन्सचा आवाज, आणि ' पॅक ', ' ब्लाइंड ', ' सीन ', ' शो ' या शब्दांशिवाय दुसरं कांहीं ऐकूं येत नाहीं. नोकर चंदर प्रवेश करतो. ]

**चंदर** : साहेब, बाहेर कुणी तरी आलंय्.

**बाबुराव** : कोण आहे ? ( डावांत ) रुपी ब्लाइंड.

**एक** : दोन सीन.

**दुसरा** : पॅक...

**शकुंतला** : कव्हर...

**चंदर** : कुणी तरी म्हातारेसे आहेत.

**बाबुराव** : आतां कशाला कडमडायला आला आहे ?...( डावांत ) पॅक.

**शकुंतला** : असतील कुणी...

**बाबुराव** : दे पाठवून... ( चंदर जातो. डाव चालूच. चंदर थोड्या वेळानें येतो. बरोबर मास्तर. वार्धक्यानें थकलेले. )

**चंदर** : साहेब...

**बाबुराव** : ( लक्ष न देतां ) बसा... कोणाला भेटायचंय् तुम्हांला ?

**मास्तर** : शकू... शकुंतलादेवींना भेटायचंय्... ( शकुंतला आवाज

ऐकतांच वळून पाहते. क्षणभरानं तिला ओळख पटते. हातांतलीं पानं टाकून देते आणि झटकन् उभी राहते.)

**शकुंतला** : सर... सर तुम्ही... ?

**मास्तर** : होय, मी...

**शकुंतला** : ( टेबलाकडे पाहते, चेहऱ्यावर शरम. बाबुरावाला ) तुम्ही जरा वर बसतां का... ? माझे सर आले आहेत.

**बाबुराव** : सर... ?

**शकुंतला** : ओळखलं नाहींस त्यांना...

**बाबुराव** : नाहीं ...कम ऑन. आपण वर जाऊन बसूं. आपल्याला डिस्टर्बन्स नको त्यांचा. ( चौघे खेळ पॅक अप करून् वर जातात. )

**शकुंतला** : ( ओशाळत ) माफ करा सर. बाबूनं ओळखलं नाहीं तुम्हांला...

**मास्तर** : त्याकरितां तूं कशाला माफी मागायला हवीस ?

**शकुंतला** : ( पुढें होऊन ) नमस्कार करते. ( पायांना हात लावून धूळ मस्तकी लावते. )

**मास्तर** : वुइश यू ऑल द बेस्ट.

**शकुंतला** : ( चमकते. ) सर.. आशीर्वाद... आणि इंग्रजींत ? परकं वाटतं सर...

**मास्तर** : फिल्मी नमस्कारहि परका वाटतो.

**शकुंतला** : शक्य आहे सर. संवयीचा दोष आहे तो. पण सर, नमस्कारामागची भावना खोटी नव्हती.

**मास्तर** : आशीर्वादहि मनापासून होता, शकुंतलादेवी.

**शकुंतला** : शकुंतलादेवी ? मी इतकी दूर गेली आहें तुमच्यापासून ?

**मास्तर** : तसं असतं तर अनाहूत आलों नसतों तुझ्याकडे.

**शकुंतला** : ( खोटं हंसत ) मग हरकत नाहीं. बसा ना सर. आल्यापासून तुम्ही उभेच आहांत. तुम्हांला बसायलाहि सांगितलं नाहीं... इतक्या वर्षांनीं तुम्ही आलांत आणि मी गोंधळून गेलेंय्...

**मास्तर** : मी मात्र इतक्या वर्षांनीं गोंधळून गेलों आाण आलों.

**शकुंतला** : आल्यापासून तुम्ही कोड्यांत बोलत आहांत सर...

**मास्तर** : शक्य आहे. वेदना जेव्हां आंतल्या आंत जळत राहतात। तेव्हां शब्दांचं रूप घेतांनासुद्धां त्रास पडतो.

**शकुंतला** : मला समजतंय् सर माफ करा... जें पहायला नको तें तुम्हीं पाहिलंत. तुमची लाडकी विद्यार्थिनी जुगार खेळतांना...

**मास्तर** : जुगारांत हल्लीं पाप नाहीं समजत मी बेटा... चार भिंतीं-आड खेळला तर निदान जगांत बेअब्रू होत नाहीं. तुझ्या जुगाराचं मला कांहींच वाटलं नाहीं.

**शकुंतला** : मला लाजवूं नका सर...

**मास्तर** : मग लाज वाटेल असं आपण वागूं नये...

**शकुंतला** : इतक्या वर्षांनीं सर तुम्ही भेटलांत. मायेचं माणूस भेटलं म्हणून मला इतका आनंद झाला, आणि सर, तुमच्या प्रत्येक वाक्यानं त्या आनंदाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडताहेत. कां आलांत तुम्ही सर... का आलांत ?

**मास्तर** : क्षमा मागायला आलोंय् मी तुझी...

**शकुंतला** : क्षमा... माझी क्षमा... ?

**मास्तर** : हो... काल वर्तमानपत्रांत वाचलं. तूं नाटकांत काम केलंस. दारू पिऊन... तुझा तोल जात होता... प्रेक्षकांनीं गोंधळ करून नाटक बंद पाडलं त्या बातमींतला शब्दन् शब्द माझं काळीज चराचरा कांपत जात होता. शकुंतलानं हें असं केलं.. ? शकूनं ? गेले कित्येक दिवस तुझ्याबद्दल कांहींबाहीं ऐकतोंय्... कधीं कांहीं खरं मानलं नाहीं... वाटायचं, नटीचं चारित्र्य ही अशी गोष्ट आहे कीं, कुणीहि जातां–येतां सहज गंमत म्हणून चिखल फेकावा...पण शकू अशी नाहीं. माझ्या डोळ्यांसमोर चित्र होतं... शाळेंतल्या त्या शालीन शकूचं... पण काल बातमी वाचली आणि तें चित्र पुसून गेलं... कायमचं... काय झालं हें... आणि कां ? याला जबाबदार कोण ? मस्तक गरगरायला लागलं. याला जबाबदार मी आहें. सिनेमांत काम करायची संधि तुझ्या दाराशीं घेऊन येणारा, तुझ्या कलेला पंख मिळावेत म्हणून धडपडणारा मी... पण मला काय माहीत, कीं ज्या विश्वांत मीं तुला सोडून दिली तो मार्ग आकाशाचा नव्हता, पाताळाचा होता... आज तूं

कदाचित् सुखी असतीस... पण नाहीं, तें व्हायचं नव्हतं... अपराध माझा आहे... माझा...

**शकुंतला :** नाहीं सर... तें व्हायचं नव्हतं... म्हणून झालं नाहीं. दोष कुणाचाच नाहीं सर... तुमचा तर नाहींच नाहीं... आयुष्याच्या रेषा कुणालाच बदलतां येत नाहींत.... 'जर तर'... या साऱ्या फसव्या गोष्टी आहेत... तुम्ही मनाला लावून घेऊं नका... मी सुखांत आहे...

**मास्तर :** तूं सुखांत आहेस ? मग दारूंत बुडवतेस तें काय ?

**शकुंतला :** इतर खूप गोष्टी ...

**मास्तर :** कोणत्या ?

**शकुंतला :** खूप. शब्दांत न पकडतां येणाऱ्या !

**मास्तर :** का न सांगण्यासारख्या !

**शकुंतला :** लपवण्यासारखं राहिलंय् काय ?

**मास्तर :** म्हणजे दारू खूप पितेस ?

**शकुंतला :** खूप नाहीं... पण कमी नाहीं...

**मास्तर :** लाज नाहीं वाटत तुला... ?

**शकुंतला :** लाज ? कशाची... ? साऱ्या– साऱ्याच्या पलीकडे गेलेय् मी सर... लाज एकदांच वाटली... चित्रपटांतला पहिला प्रेमप्रसंग... त्यानं माझा हात हातांत घेतला आणि त्या स्पर्शानं साऱ्या शरिरावर नुसता मोहोर फुलला.. तो क्षण अजून जपून ठेवलाय् मीं... आणि त्यानंतर प्रत्येक शृंगार-प्रसंग मीं मेल्या मनानं आणि निर्जीव शरीरानं केलाय्... नायकाच्या खांद्यावर मान ठेवून डोळ्यांत ग्लिसरीनचे अश्रू आणून, 'कांचेच्या चंद्रा'च्या साक्षीनं प्रेम केलंय्, ओठानं म्हणत, "तूं माझा आहेस, तूं माझा आहेस." त्या उत्कट क्षणींसुद्धां माझं शरीर प्रेतासारखं थंड असायचं. मला शरीरच राहिलं नाहीं आतां. एक संवेदनाहीन मांसाचा गोळा... या कचकड्याच्या दुनियेंतलीं सारीं माणसंच कचकड्याचीं आहेत. या कचकड्याच्या माणसांना कसली आली आहे अब्रू... कसलं शील आणि कसली लाज ? आणि शिवाय मी हें सारं स्वतःच्या इच्छेनं कुठं करते आहे ? चावीच्या खेळण्याचा कुठं असतो स्वतःवर अधिकार ?

**मास्तर** : तरीहि मला वाटतं... स्वतःच्या शरीराचं, स्त्रीत्वाचं उत्तान प्रदर्शन... खरं नाहीं शकुंतला... हें खरं नाहीं...

**शकुंतला** : हेंच खरं आहे सर... ध्येय, कला... या साऱ्या गोष्टी शब्दांत ! पोटं चालतात व्यवहारावर...

**मास्तर** : याकरतां तूं सिनेमांत गेलीस ?

**शकुंतला** : नाहीं सर... तुम्हांला माहिती आहे. ध्येय, कला या शब्दांचा अर्थहि मला माहीत नव्हता तेव्हां, मला... मला... माझ्या अण्णांना, आईला सुखी करायचं होतं... त्यांचीं सारीं कर्जं फेडून टाकायचीं होतीं. त्यांना चार सुखाचे दिवस दाखवायचे होते. ऐषारामांत ठेवायचं होतं... माझीं स्वप्नं इतकीं लहान होतीं... पण नंतर दोनच वर्षांत अण्णा गेले आणि त्यांच्या पाठोपाठ सहाच महिन्यांनीं आई पण गेली... त्यांच्या नशिबांत नव्हतं. मी तरी काय करूं ? निदान माझे अण्णा कर्जाच्या, माझ्या लग्नाच्या कर्जाच्या भाराखालीं गुदमरून मरून गेले नाहींत हेंच माझं मोठं समाधान आहे...

**मास्तर** : समाधान... सुख शोधावं लागलं नाहीं तुला ? ||

**शकुंतला** : तें कुणाला शोधावं लागत नाहीं ?

**मास्तर** : इतकी कीर्ति मिळवून तूं दुःखी ?

**शकुंतला** : रुपेरी पडद्याचा शाप आहे हा, वैभवाच्या बरोबरच मिळालेला !

**मास्तर** : शकुंतला, मला परत परत वाटतंय्, दोष माझा आहे.

**शकुंतला** : असं नका म्हणूं.

**मास्तर** : मग तूं कां इतकी पितेस ?

**शकुंतला** : नाइलाजानं.

**मास्तर** : आणि तुझं कुल–शील ? संस्कार... ?

**शकुंतला** : त्याच्या आड येत नाहींत. आणि सर, माझ्यावर विश्वास ठेवा. ही संवय मीं लावून घेतली नाहीं.

**मास्तर** : मग ?

**शकुंतला** : मला जबरदस्तीनं लावली...

**मास्तर** : कुणीं... ?

**शकुंतला** : दुसरं कोण... ?

**मास्तर** : ( लक्षांत येऊन ) अस्सं... ? पण कां.... ?

**शकुंतला** : याचं उत्तर अजून मलाहि मिळालेलं नाहीं...( विषय बदलत ) सर.... तुम्ही सरबत घेणार का चहा ?

**मास्तर** : नाहीं, कांहीं नको...

**शकुंतला** : माझ्या घरीं पाणीहि प्यायचं नाहीं इतकी मी वाईट आहे ? मला फार वाईट वाटेल तुम्हीं कांहीं घेतलं नाहीं तर... माझ्या घरीं आज तुम्ही आलांत प्रथमच. या खोट्या बेगडी दुनियेंतून मी क्षणभर बाहेर आलें. बाईजी, देवीजी, याऐवजीं कुणी तरी शकू, शकुंतला अशी हांक मारली, खोट्या लाळघोट्या हांजीहांजीऐवजीं रागाचे चार शब्द बोललं, तो प्रत्येक शब्द मला लाख-मोलाचा आहे. माझ्यावर कृपा करा सर, माझ्या घरीं आलांत, नुसतं जाऊं नका...

**मास्तर** : ठीक आहे...

**शकुंतला** : चंदर.. [ येतो. ] एक ग्लास सरबत घेऊन ये. ( जातो. ) आज मला खूप बरं वाटतंय्, सर. मोकळं मोकळं... माझ्या आयुष्याचा अप्रिय विषय आपण सोडून देऊं... तुमच्याविषयीं कांहीं सांगा, नवं जुनं... कांहीं तरी बोलत राहा. ( चंदर सरबत आणतो. ) घ्या सर... ( स्तब्धता ) तुम्ही थकलां आतां सर.

**मास्तर** : वय झालं ना.

**शकुंतला** : म्हातारपण फार वाईट, नाहीं सर ?

**मास्तर** : तें आयुष्यांत आपण काय मिळवलं यावर अवलंबून असतं. मीं शिकवलेले खूप विद्यार्थी आतां मोठे झाले आहेत.

**शकुंतला** : माझ्यासारखी फुकट गेलेली एखादीच.

**मास्तर** : असं नको म्हणूं शकू.

**शकुंतला** : कां ? खरं आहे ना तें ?

**मास्तर** : कीर्तीदेखील कमी नाहीं मिळवलीस तूं ?

**शकुंतला** : बरी-वाईट,– दोन्ही.

**मास्तर** : तूं वाईट गोष्टी कां सोडून देत नाहींस ?

**शकुंतला** : तशा सुटत नाहींत त्या. आणि माझ्या दुनियेत त्या गृहीत आहेत. त्या नसल्या तर दुष्कीर्ति होईल माझी !

**मास्तर** : मर्जी तुझी.

**शकुंतला** : राग आला सर ?

**मास्तर** : मुळींच नाहीं. शकू, लौकिकार्थानं तूं कितीहि वाईट असलीस तरी एक समाधान आहे मला...तूं ढोंगी नाहींस,फार फार प्रामाणिक आहेस... थांब, मला आणखी थोडं सांगायचं आहे. शाळेच्या मदतीकरितां कांहीं नाटकं लावलीं आहेत. एका नाटकांत तूं आहेस. ठेकेदाराकडून कळलंय्. माझी एक विनंती आहे तुला.

**शकुंतला** : विनंती ?

**मास्तर** : त्या दिवशीं व्यवस्थित काम करायचं.

**शकुंतला** : व्यवस्थित म्हणजे ?

**मास्तर** : न पितां. वचन हवंय् मला.. हें एवढंच मागणं आहे. तुझ्याकडून शाळेला निराळी देणगी नको.

**शकुंतला** : वचन दिलं सर. पण सर, देणगी न घेण्याइतकी ही मोठी किंमत आहे असं वाटतंय तुम्हांला ?

**मास्तर** : तसंच नाहीं; पण...

**शकुंतला** : तसंच. ठीक आहे. मला मान्य आहे तुमची अट.

**मास्तर** : आणि ही अट पाळल्यावर जरूर देणगी घ्यायला येईन.

**शकुंतला** : जशी तुमची इच्छा.

**मास्तर** : मी निघतों आतां. खरं म्हणजे संतापून आलों होतों मी. पण आतां मला वाटतंय् तुला थोडंफार समजूं शकलों मी. संपूर्ण नाहीं. तुझ्या या सबंध आयुष्यांत कुठं तरी एक सूर बेसूर लागलाय्. तो शोधण्याचा प्रयत्न करतांना मनांत येतं...लग्न केलं असतंस, हा व्यवसाय पत्करूनसुद्धां, तर तूं खूप सुखी झाली असतीस. बोल, कां नाहीं केलंस लग्न ?

**शकुंतला** : नको सर...फार वाईट प्रश्न विचारलात तुम्हीं !

**मास्तर** : तुझ्या वर्मावर बोट ठेवलं कीं दु:खावर ? \\

**शकुंतला** : कशाला हवंय् तुम्हांला याचं उत्तर ?

**मास्तर** : मला समजून घ्यायचंय् तुला ..

**शकुंतला** : त्याचा कांहीं उपयोग नाहीं सर.

**मास्तर** : शकुंतला, मला नाहीं सांगणार... ?

**शकुंतला** : सर, नका या प्रश्नाचा आग्रह धरूं.

**मास्तर** : कां... ?

**शकुंतला** : तुमच्याशीं खोटं बोलणं जड जाईल मला.

**मास्तर** : माझ्यावर विश्वास ठेव. मी कुणाला सांगणार नाहीं.

**शकुंतला** : फार भयंकर आहे तें !

**मास्तर** : शकू...

**शकुंतला** : होय सर...मीं लग्न केलं नाहीं. कारण...कारण ( जिन्यावर पावलं वाजतात. बाबुरावांचा हंसण्याचा आवाज. शकुंतलाचा चेहरा बदलतो. बघतां बघतां निर्विकार होतो. ) कारण लग्न करून हा व्यवसाय करणं कठीण गेलं असतं. ( मास्तरांच्या नजरेंत अविश्वास. ती असहाय. बाबुराव आणि त्याचे मित्र बोलत बोलत खालीं येतात. )

**एक** : ( शकुंतलेला ) तुम्ही गेलांत आणि डावांतला चार्म गेला.

**दुसरा** : आपलीं पानंच चालत नव्हतीं. बाबुरावानं धुतलं साफ.

**बाबुराव** : ठीक आहे. नेक्स्ट टाइम. उद्यां नाहीं, परवां संध्याकाळीं ( मित्र जातात. बाबूराव वळतो. )

**शकुंतला** : हे आपल्या शाळेंतले सर...

**बाबुराव** : असं होय ? नमस्कार ! मघाशीं ओळखलंच नाहीं. काय एवढ्या गप्पा चालल्या होत्या !

**शकुंतला** : शाळेच्या.

**बाबुराव** : हल्लीं देणग्या देणं आपण बंद केलंय्, सांगितलंस कीं नाहीं त्यांना ?

**शकुंतला** : देणगीसाठीं आले नाहींत ते.

**बाबुराव** : असं ? गुड ! मग आज इकडं कुठं वाकडी वाट केलीत मास्तर ?

**मास्तर** : वाकड्या वाटेवरच्या माणसांना भेटायला वाट वाकडी करायला नको ?

**बाबुराव** : हं... खरं आहे मास्तर...

**शकुंतला** : सर, तुम्ही गेलात तरी चालेल...

**बाबुराव** : नो...मास्तर... तुम्ही बसा जरा.

**शकुंतला** : पण कशाला ?

**बाबुराव** : मास्तर वाकड्यांत शिरलेत, तेव्हां कांहीं गोष्टी जरूर स्पष्ट व्हायला हव्यात. मास्तर, वाकड्या वाटेवरच्या या माणसांना वाकडी वाट दाखवली कुणीं ?

**मास्तर** : मीं...पण वाट मुळांत वाकडी नव्हती. तोल सुटलेल्या माणसाला सरळ वाट वाकडी होते...

**बाबुराव** : तरीहि दोष मुळांत तुमचाच आहे. आणि मास्तर, तुम्ही शकुंतलेला चांगलं काय, वाईट काय याविषयीं उपदेशाचे डोस पाजायला आलां आहांत ?

**शकुंतला** : त्याकरतां आले नाहींत ते.

**बाबुराव** : मग कशाकरतां आले आहेत ? पिक्चर्स साइन करायला आले आहेत का नाटकाचं कंत्राट घेऊन आले आहेत ?

**शकुंतला** : सरांचा अपमान नको रे करूं.

**बाबुराव** : मला डिवचायला त्यांना कांहीं गरज नव्हती. मीं काय घोडं मारलंय् तुमचं ? कुणीं सांगितलं आम्ही वाकड्या वाटेनं जातोंय् ?

**मास्तर** : तुम्हीच.

**बाबुराव** : माझं आयुष्य स्वतःचं आहे. त्याचं मी वाटेल तें करीन.

**मास्तर** : जरूर. आणि शकुंतलाचं आयुष्य ? तेंहि तुमचंच आहे... ?

**बाबुराव** : तुमचा काय संबंध त्याच्याशीं ? तुम्ही कोण मला विचारणार ? अधिकार काय तुम्हांला ?

**शकुंतला** : सर... तुमचा आणखी अपमान नको व्हायला... जा सर तुम्ही इथून.

**मास्तर** : असूं दे... जिथं जीव अडकलेला असतो तिथं मान—अपमान यांसारख्या क्षुल्लक गोष्टींना किंमत नसते...तुझ्या आयुष्याशीं खेळायचा याला काय अधिकार ?

**बाबुराव** : कुणीं सांगितलं हें ? शकुंतलानं ?

**मास्तर** : ती बिचारी काय सांगणार... तिचा अधिकारच नाहीं स्वतःवर.

**बाबुराव** : होय ... माझा अधिकार आहे तिच्यावर. दुसऱ्या कुणाचाच नाहीं. तुम्हांला काय माहीत मास्तर, तिच्याकरितां मीं काय काय केलंय् ? पहिल्या पहिल्यांदा तिच्या खाण्याचा डबा घेऊन तासन् तास स्टुडिओच्या दाराशीं ताटकळत उभा राहिलोंय् मी. वासनेनं बरबटलेल्या त्या किसळवाण्या जगापासून माझ्या धाकट्या बहिणीचं रक्षण करण्याकरितां स्टुडिओंत रात्री रात्री जागून काढल्या आहेत मीं... तिच्या पाठीशीं पहाडासारखा उभा होतों म्हणून तिला हे दिवस दिसले... माझ्या साऱ्या इच्छा, आकांक्षा सारं मारून टाकलं मी. तिच्याकरितां... केवळ तिच्याकरितां. माझं आयुष्य ही स्वतःची गोष्ट राहिलीच नाहीं. मला स्वतःला काय वेगळं आयुष्य नको होतं ? पण मला तें विसरावं लागलं... माझं आयुष्य तिच्या आयुष्याची एक लांबच लांब सावली झाली, स्वतंत्र अस्तित्व नसलेली, वेगळी न होऊं शकणारी... तिचं आयुष्य तें माझं, माझं आयुष्य तें तिचं, बस्स... सांगा मास्तर, माझा तिच्यावर संपूर्ण अधिकार नाहीं... ?

**मास्तर** : पण म्हणून हें असं कायमचं तिला जखडून ठेवलंत तुम्ही ?

**बाबुराव** : ( स्वतःशींच ) त्याला इलाज नाहीं. मला आतां संवय झाली आहे तिची. ( शॉक्ड सायलेन्स – भानावर येत ) मास्तर, तुम्ही जाऊं शकतां. मी इथं असतांना शकुंतलेला कुणाच्याहि सल्ल्याची, उपदेशाची, आधाराची गरज नाहीं... ( थांबून ) कदाचित् मी तुम्हांला सन्मानानं वागवलं असतं मास्तर. पण... ( क्षणभर स्तब्धता ) जा... जा तुम्ही मास्तर...

**मास्तर** : शकुंतला, मी जातों. पुन्हां येणार नाहीं... ( शकुंतला गप्प, मास्तर जातात. )

**शकुंतला** : सर...सर...असं दुखावून जाऊं नका सर...माझ्याकरतां...सर...सर ...( बाबुराव अडवतो ).

**बाबुराव** : मास्तर गेले......

**शकुंतला** : तूं घालवलंस त्यांना......

**बाबुराव** : शांत हो...

**शकुंतला** : कां ? कां अपमान केलास त्यांचा... ?

**बाबुराव** : माझा इलाज नव्हता. ( बोलत बोलत फ्रिजकडे जातो आणि बाटली काढतो. दोन ग्लासेस. )

**शकुंतला** : मला नको आतां... ( न बोलतां बाबुराव ग्लास भरतो आणि तिच्याकडे घेऊन येतो. ) मला खरंच नकोय्. मला खरंच नकोय्...

**बाबुराव** : तुला गरज आहे त्याची...घे...घे...मी सांगतों आहें म्हणून घे...तुला प्यायलाच हवी...

( ती अनिच्छेनें ग्लास तोंडाला लावते... संपूर्ण अंधार... )

## दृश्य दुसरें

[ **काळ** : चार दिवसांनंतरचा. **वेळ** : सायंकाळची. बाबुराव जिना उतरून खालीं येतो. बाहेर जायच्या तयारींत. दिवाणखान्यांत चंदर. ]

**चंदर** : साहेब...

**बाबुराव** : काय— ?

**चंदर** : माझं थोडं काम आहे साहेब...

**बाबुराव** : आतां बाहेर जातांना काय ?

**चंदर** : आपण नेहमीं कामांत असतां साहेब...

**बाबुराव** : काय हवं आहे... ?

**चंदर** : थोडेसे पैसे हवे आहेत.

**बाबुराव** : वाटलंच मला. पगार दिला ना मागच्या महिन्याचा ? आतां कसले सारखे पैसे द्यायचे... ?

**चंदर** : थोडीशी कर्जाऊ रक्कम पाहिजे.

**बाबुराव** : थोडीशी म्हणजे कितीशी... ?

**चंदर** : एक पांचशें रुपये... पोरीचं लग्न काढलंय्...

**बाबुराव** : पांचशें... ? मीं नोटांचा छापखाना काढलाय् असं वाटतं कीं काय तुला ?

**चंदर** : नाहीं साहेब. तशी फार मोठी रक्कम नाहीं. मनांत आणलं तर तुम्ही देऊं शकाल...

**बाबुराव** : पोरीच्या लग्नाकरितां एवढे रे कशाला खर्च करायला पाहिजेत ? पैसे मिळणार नाहींत.

**चंदर** : साहेब, नाहीं नका म्हणूं...दुसरीकडे कुठं मिळणार मला. ?

**बाबुराव** : धर्मादाय संस्था काढली नाहीं मीं...

**चंदर** : तुमचे पैसे बुडवणार नाहीं मी...

**बाबुराव** : बुडवायला माझ्यापाशीं पैसेच नाहींत. पैसेबिसे कांहीं मिळणार नाहींत. तूं दुसरी व्यवस्था बघ.

**चंदर** : माझ्या पोरीच्या आयुष्याचा प्रश्न आहे साहेब. आजपर्यंत कधीं हात पसरला नाहीं तुमच्याकडे, पण या वेळेला नाहीं नका म्हणूं. कातड्याचे जोडे करून पायांत घालीन.

**बाबुराव** : नाटकांतलीं खोटीं वाक्यं नको म्हणूं. ( जिन्यावर शकुंतला उभी ) लोकांचीं घरं उभारायला माझ्यापाशीं पैसा नाहीं...एकदां सांगून समजत नाहीं ? एक पैसाहि मिळणार नाहीं. ( वळतो. शकुंतला दृष्टीस पडते. ) मी जरा क्लबवर जातों आहें. जास्ती काम नाहींये, मी जाऊन येतों. ( जातो. ) चंदर खिन्न मनानं जायला निघतो. )

**शकुंतला** : चंदर...

**चंदर** : तुम्हीं हांक मारलीत, बाईसाहेब ?

**शकुंतला** : काय चाललं होतं ?

**चंदर** : कांहीं नाहीं.

**शकुंतला** : मीं ऐकलंय् सारं......

**चंदर** : मला पैसे हवे होते थोडेसे...

**शकुंतला** : कशासाठीं ?...

**चंदर** : पोरीच्या लग्नासाठीं...

**शकुंतला :** किती वर्षांची मुलगी आहे रे तुझी ?

**चंदर :** सतरा वर्षांची.

**शकुंतला :** सतरा वर्षांची ? तुझी पोरगी आतां गोड दिसत असेल, नाहीं ? दोन वेण्या घालणारी, लाजरीबुजरी, निरागस चेहऱ्याची, आकर्षक, भाबड्या मनाची आणि अतिशय हळवी.

**चंदर :** तुम्हीं पाहिली आहे माझ्या मुलीला ?

**शकुंतला :** हो, पाहिली आहे.

**चंदर :** पण इथं तर कधींच आली नाहीं...

**शकुंतला :** तरीहि पाहिली आहे...खूप वर्षांपूर्वी.. पुण्याच्या एका वाड्यांत...

**चंदर :** मला समजत नाहीं तुम्ही काय सांगतां तें...

**शकुंतला :** तिच्याकरितां तूं शोधलेला जोडीदार पण तसाच असेल. हुशार, तरतरीत. त्याला आवडली असेल ती– आणि तिला तो.. (एकदम) चंदर, तुला किती पैसे हवे आहेत... ?

**चंदर :** पांचशें रुपये...

**शकुंतला :** (क्षणभर स्तब्ध. गळ्यांतलं सोन्याचं लॉकेट काढते.) हें... घे...

**चंदर :** हें काय बाईसाहेब... ?

**शकुंतला :** माझ्याकडे रोख पैसे नाहीयेत आतां...हे गहाण टाक, वीक, कांहींहि कर. तुझ्या गरजेइतके पैसे नक्की उभे राहतील...

**चंदर :** नको बाईसाहेब...

**शकुंतला :** तुला घ्यायलाच हवं चंदर... तुझ्या 'शकू'चं लग्न व्हायला हवं. (चंदर घेतो.)

**चंदर :** तुमचे उपकार कसे फेडूं बाईसाहेब ?

**शकुंतला :** तुझ्या मुलीचं लग्न झालं ना, कीं 'मुंडावळ्या बांधलेली, नवऱ्या-शेजारीं बसलेली तुझी मुलगी आणि तिचा नवरा' असा एक छानसा फोटो दे मला...

**चंदर :** जी बाईसाहेब...

**शकुंतला** : जा तूं...मला एकटीला बसायचं आहे.

( चंदर जातो. दीर्घ स्तब्धता. उघड्या दारांतून विश्वनाथ येतो. दारांत थबकतो. तिच्याकडे एकटक पहात राहतो. शकुंतला सहजच वळते...त्याला पाहतांच दचकते... )

**शकुंतला** : कोण तुम्ही ? तुम्हांला कोण हवंय्...? ( तो गप्प ) चंदर... चंदर...

**विश्वनाथ** : मला ओळखलं नाहीं तुम्ही ? मी.. विश्वनाथ कर्वे...

**शकुंतला** : विश्वनाथ कर्वे...? मी ओळखत नाहीं तुम्हांला...

**विश्वनाथ** : खोटं...

**शकुंतला** : मला भेटायचं नाहीं तुम्हांला.

**विश्वनाथ** : हेंहि खोटं...साफ खोटं...

**शकुंतला** : कां ? कां आलांत तुम्ही इथं...

**विश्वनाथ** : तुम्हांला भेटायला...प्रथम माझी ओळख करून देतों. कारण तुम्ही ती फार लवकर विसरलांत...मी विश्वनाथ कर्वे. चौदा वर्षांपूर्वी अण्णा भावे यांच्या पुण्याच्या वाड्यांत मी एक मुलगी पहायला आलों होतों. तिचं नांव शकुंतला...एक साधी, सोज्ज्वळ, भाबड्या अंतःकरणाची गोड मुलगी...

**शकुंतला** : पुरे...पुरे...मला माहिती आहे सारं. सारं माहिती आहे मला...

**विश्वनाथ** : असं ? मला वाटलं...

**शकुंतला** : तुम्ही इथं आलांत कसे ?

**विश्वनाथ** : इतक्या सहज मी इथं येऊं शकेन असं मलाहि वाटलं नव्हतं.

**शकुंतला** : तुम्हांला माझ्याकडून काय हवंय्... ?

**विश्वनाथ** : आतां कांहींच नको. चौदा वर्षांपूर्वी मात्र होकार हवा होता... ती गोड मुलगी आवडली होती... तिला मीं होकारहि कळवला होता. पण तिनं मला स्पष्ट कळवलं, ' मला तुमच्याशीं लग्न करायचं नाहीं... '

**शकुंतला** : त्या गोष्टीची चर्चा आतां कशाला ?

**विश्वनाथ** : ओळख पटवायला...

**शकुंतला :** माझ्या नकाराचं दु:ख आहे तुम्हांला... ?

**विश्वनाथ :** मुळींच नाहीं– लग्न ही दैवाची गोष्ट मानतों मी.

**शकुंतला :** तुम्हांला दु:ख नाहीं त्याचं... ?

**विश्वनाथ :** नाहीं. कां ? याचं दु:ख वाटतंय् तुम्हांला ?

**शकुंतला :** कशासाठीं... ?

**विश्वनाथ :** आपल्याकरितां कुणीं तरी झुरावं, रडावं, जन्मभर अविवाहित रहावं. झिजून झिजून मरावं अशीहि अपेक्षा असेल तुमची. पण हळवा असलों तरी मूर्ख नाहीं मी. असल्या खुळचट कल्पना मीं उराशीं कधींच बाळगल्या नाहींत; आणि मला वाटतं, आपलं लग्न झालं नाहीं याचं तुम्हांला दु:ख निश्चित नाहीं.

**शकुंतला :** त्याचीच शहानिशा करायला तुम्ही आलां आहांत ?

**विश्वनाथ :** नाहीं.. मला जाब दुसऱ्याच गोष्टीचा विचारायचा आहे...

**शकुंतला :** जाब ? मला जाब विचारणारे तुम्ही कोण ?

**विश्वनाथ :** जाब शब्द आवडला नसेल तर स्पष्टीकरण म्हणूं आपण...

**शकुंतला :** उत्तरं द्यायला बांधलेली नाहीं मी ..

**विश्वनाथ :** तुम्हांला द्यावीं लागतील. माझी गोष्ट नाकारायचा तुम्हांला काय अधिकार होता ?

**शकुंतला :** कोणती गोष्ट... ?

**विश्वनाथ :** लपंडाव पुरे झाला... आपण सरळ बोलूं या..

**शकुंतला :** असं... तुमची गोष्ट मीं नाहीं नाकारली...

**विश्वनाथ :** तुम्हींच नाकारलीत... मला नुकताच सारा इतिहास कळला. किती सुंदर गोष्ट होती ती ! निर्मात्यांना आवडलेली. त्याच्यावरचा चित्रपट कदाचित् गाजला असता. आज मी कदाचित् एखादा प्रसिद्ध सिनेपटकथा-लेखक झालो असतों. कीर्ति-वैभव मिळवायचं माझं स्वप्न साकार झालं असतं. कुणाला मिळत नाहीं ती संधि माझ्या दाराशीं चालत आली होती. पण तुम्हीं, तुम्हीं त्या साऱ्या स्वप्नांचा चुराडा केलात. तुमच्याकडे ती गोष्ट पसंतीला आली आणि नकार कळवलात तुम्हीं. माझ्या गोष्टीला नालायक ठरविण्याचा अधिकार

काय तुम्हांला ? एक नटी म्हणूनच ना ? माझी सारी उमेद खची केलीत तुम्हीं. मूर्खपणा असेल माझा. पण त्या दिवसापासून एक अक्षरहि लिहिलं नाहीं मी. माझ्यांतला वर येऊं पाहणारा लेखक त्या दिवशींच संपला. आतां वाटतं तो सारा मूर्खपणा होता. मी लिहिणं थांबवायला नको होतं. पण तें घडलं. लहानशा अपयशानं खचून जाण्याइतका लहान मी कां झालों तें माझं मलाच समजत नाहीं...पण याला जबाबदार तुम्ही आहांत...

**शकुंतला :** खरंच, याला जबाबदार मी नाहीं.

**विश्वनाथ :** माझी माहिती खोटी नाहीं. या पिक्चरमध्यें मला काम करायचं नाहीं असं तुम्हीं कळवलंत. तुमचं नाणं चलनी होतं. तुमच्या शब्दा-बाहेर जाण्याची निर्मात्याची छाती नव्हती. त्यानं स्टोरी परत पाठवली...

**शकुंतला :** मला तुमची गोष्ट खरोखरच खूप आवडली होती.

**विश्वनाथ :** खोटं... ढोंग मलाहि समजतं ..

**शकुंतला :** हें ढोंग नाहीं, हें खरं आहे. तुमची गोष्ट मीं नाहीं नाकारली... माझ्या भावानं नाकारली... बाबुरावानं.

**विश्वनाथ :** संबंध काय त्यांचा ?

**शकुंतला :** माझे सर्व व्यवहार तोच बघतो.

**विश्वनाथ :** माझा विश्वास नाहीं याच्यावर.

**शकुंतला :** माहिती अपूर्ण आहे मग तुमची. मी स्वतंत्रपणं कांहींच करूं शकत नाहीं. मी माझी नाहीं... माझी नाहीं, कुणाचीच नाहीं. मी गुलाम आहे सर्वांची; गुलाम आहें परिस्थितीची. एखाद्या कळसूत्री बाहुलीप्रमाणं मी नाचतेंय् कुणाच्या तरी तालावर. माझ्या आयुष्याच्या दोऱ्या सारख्या खेचल्या आहेत कुणीं तरी. आणि मी नाचलेंय्, नाचत राहिलेंय् भोवळ येईपर्यंत. मला मन नाहीं, भावना नाहींत, मला आहे फक्त शरीर. तेंहि माझं नाहीं. मग माझं काय आहे ? मी कशाकरतां जगतेंय् ? कुणाकरतां जगतेंय् ? आणि कां जगतेंय् ? कारण मरणदेखील माझ्या हातांत नाहीं .. मी दोषी, मी जबाबदार, मी ढोंगी एवढंच म्हणायचं आहे ना तुम्हांला... ? ठीक आहे. मान्य आहे मला तुमचं म्हणणं . एवढ्यानं तुमचं समाधान होत असेल तर सारं पाप

मी माझ्या शिरावर घ्यायला तयार आहे. आणि एवढंच काम असेल तर तुम्ही जाऊं शकतां.

**विश्वनाथ :** तुम्हीं खरंच नाकारली नाहींत ?

**शकुंतला :** एकदां सांगितलं मीं…

**विश्वनाथ :** ठीक आहे. या विषयावर बोलत नाहीं मी.

**शकुंतला :** दुसऱ्या कोणत्याच विषयावर मला बोलायचं नाहीं.

**विश्वनाथ :** ( नरमाईनें ) मला तुम्हांला समजून घ्यायचं असलं तरी…

**शकुंतला :** बोला.

**विश्वनाथ :** एक विचारावंसं वाटतंय्…

**शकुंतला :** काय… ?

**विश्वनाथ :** तुम्ही मला नकार दिलात, कारण तुमच्या वडिलांना खूप कर्ज होतं ?

**शकुंतला :** हो… लग्न करून वाढलं असतं तें…

**विश्वनाथ :** पण मीं हुंडा घेतला नसता… पै देखील… लग्न थाटांत केलं नसतं… रजिस्टर केलं असतं…

**शकुंतला :** म्हणजे फक्त कर्ज वाढलीं नसतीं, इतकंच. फिटलीं नसतीं.

**विश्वनाथ :** तेंहि खरंच. पण मीं तुम्हांला लग्नानंतर सिनेमांत काम करायला परवानगी दिली असती. तुम्हीं विचारलंत तरी मला ?

**शकुंतला :** ( चमकते. ) तुम्हीं परवानगी दिली असतीत?… तुम्हीं परवानगी दिली असतीत ? सारंच चुकलं. हें कधीं मला सुचलंच नाहीं. कुठल्याच प्रतिष्ठित माणसाला हें पटणार नाहीं, हें गृहीत धरूनच मीं निर्णय घेतले चुकीचे. त्या क्षणांनीं मला फसवलं, माझी विचारशक्ती नष्ट करून टाकली आणि मीं निर्णय घेतला. एक लहानशी गोष्ट सुचली नाहीं आणि किती मोठी किंमत द्यावी लागली… ?

**विश्वनाथ :** किंमत ?

**शकुंतला :** कां सांगितलंत तुम्ही हें सारं ? आणि आतां ? इतक्या उशिरा ? आयुष्यांत किती खंत उराशीं बाळगायची मीं ? किती काळ असं जळत

रहायचं... किती काळ ? आणि... आणि त्यांतून तुमचं लग्न नेमकं माझ्या जिवाभावाच्या मैत्रिणीशीं व्हावं...

**विश्वनाथ** : मलाहि या योगायोगाचं आश्चर्य वाटतं...तुम्ही मला नकार देतां काय... मी तिला पाहतों काय... नाकारण्यासारखी नाहीं म्हणून पसंत करतों काय, आणि लग्नहि होतं... सारंच विचित्र, खोटं वाटण्याइतकं...

**शकुंतला** : प्रभा माझी मैत्रीण आहे हें माहीत नव्हतं तुम्हांला ?

**विश्वनाथ** : लग्न झाल्यावर कळलं...

**शकुंतला** : तुम्ही सांगितलंत तिला सारं...

**विश्वनाथ** : नाहीं...

**शकुंतला** : कां लपवून ठेवलंत तिच्यापासून... ?

**विश्वनाथ** : त्याचा काय उपयोग होता ?

**शकुंतला** : आणि आतां तिला कळलं तर काय वाटेल तिला ? (तो गप्प) सांगा... काय वाटेल तिला ?

**विश्वनाथ** : तिला आतां यांतलं कांहींच, कधींच कळणार नाहीं...

**शकुंतला** : ( चमकून ) म्हणजे... ?

**विश्वनाथ** : प्रभा... प्रभा गेली... वर्ष झालं...

**शकुंतला** : ... प्रभा... प्रभा गेली ?

**विश्वनाथ** : लहानशा आजाराचं निमित्त झालं... आणि कल्पना नसतांना हें जग सोडून गेली...

**शकुंतला** : प्रभा गेली.. नाहीं... नाहीं... हें खरं नाहीं... हें खरं नाहीं.. ती मला भेटणार होती...तिनं कबूल केलं होतं मला तसं...खूप वर्षं झालीं ती भेटली त्याला... अशीच एका संध्याकाळीं आली. लहानपणींच्या आठवणींत आम्ही रंगून गेलों...आणि मग...मग मी तिच्याशीं चमत्कारिक वागलें... विचित्र... तिला राग आला असेल माझा... आयुष्यभर तिनं तें मनांत ठेवलं असेल...मी दुखवलं तुला प्रभा...पण मला तुला सांगायचं होतं... मी माझी नाहीं... मी माझी नाहीं...

**विश्वनाथ** : शांत व्हा...

**शकुंतला** : शांत...?

**विश्वनाथ** : तुमचं दुःख मी समजूं शकतों. पण माझं दुःख... ?

**शकुंतला** : प्रभावर इतकं प्रेम होतं तुमचं ?

**विश्वनाथ** : फार चांगली होती ती ! तिचा दोष नसतांना तिच्यावर प्रेम न करणं शक्य नव्हतं मला...

**शकुंतला** : भाग्यवान् होती ती. खरंच भाग्यवान् होती ती... !

**विश्वनाथ** : माझं प्रेम मिळणं ही इतकी भाग्याची गोष्ट आहे ? ( ती गप्प ) मग तशा भाग्यवान् तुम्हीहि होऊं शकलां असतात ?

**शकुंतला** : कां पुन्हा तोच विषय काढतां ?...

**विश्वनाथ** : राहून राहून मनांत येतं.. तुम्हीं मला कळवलंत कां नाहीं सारं... ? कां नाहीं तुमच्या नकाराचीं कारणं सांगितलीं ? मी तुमचं मन नक्की वळवूं शकलों असतों...मला भेटायचं.. निदान...निदान एक चार ओळींचं पत्र तरी...

**शकुंतला** : म्हणजे...माझं पत्र मिळालं नाहीं तुम्हांला ?

**विश्वनाथ** : पत्र ? तुमचं ? तुम्हीं पत्र पाठवलं होतं मला... ?

**शकुंतला** : तुम्हांला नाहीं मिळालं तें... ?

**विश्वनाथ** : नाहीं...

**शकुंतला** : ( शांतपणें ) कसं मिळणार ? तें पत्र मीं बाबुरावाबरोबर पाठवलं होतं.

**विश्वनाथ** : बाबुराव...माणसं इतकीं वाईट असूं शकतात... ?

**शकुंतला** : तो माणूस नाहीं.

**विश्वनाथ** : कसं तुम्ही आयुष्य काढतां त्याच्याबरोबर ?

**शकुंतला** : सर्कशींतल्या जनावराला संवय होते साऱ्याची. म्हातारपणीं सर्कशींतल्या जनावरांना गोळ्या घालून ठार मारतात... नाहीं... ? मलाहि तो एक दिवस ठार मारील...

**विश्वनाथ** : इतकं सोपं नाहीं तें...

**शकुंतला** : फारसं कठीण नाहीं तें त्याला...

**विश्वनाथ** : इतकं जर आहे तर तुम्ही निघून कां जात नाहीं ?

**शकुंतला** : कुठं... ?

**विश्वनाथ** : माझ्याबरोबर...

**शकुंतला** : तुमच्याबरोबर... ?

**विश्वनाथ** : कां... ? काय हरकत आहे... ?

**शकुंतला** : नाहीं...नको...

**विश्वनाथ** : कां ? मीं तुमच्या योग्यतेचा नाहीं... ?

**शकुंतला** : नाहीं,– मी तुमच्या योग्यतेची नाहीं .. मी वाईट आहें हो. फार वाईट... सबंध आयुष्य चिखलांत गेलं आहे माझं... अब्रू... शील... छे...शिवाय मी पितें. तुम्हीं ऐकलं असेल माझ्याविषयीं सारं. कां... कां तडकलेलं स्वप्न सांधायचा प्रयत्न करतां आहांत तुम्ही... ?

**विश्वनाथ** : चुकतांय् तुम्ही...माझीं स्वप्नं मीं कधींच फुंकरून टाकलीं... तीं स्वप्नं फुलवायची ही धडपड नाहीं...चौदा वर्षांपूर्वीं तुम्ही मला आवडलां होतां...आजहि आवडतां...तेव्हां प्रेम होतं तुमच्याबद्दल...आज सहानुभूति वाटतेय्...मी तुम्हांला आधाराकरितां स्नेहाचा हात देणार आहें; आणि स्नेही म्हणून आपण या जगांत राहूं शकणार नाहीं म्हणून तुमच्याशीं लग्न करणार...आणि वास्तवाला सामोरं जायचं तर मनाची कोवळीक दोघांच्यांतहि उरलेली नाहीं... तुम्हांला सुखी करायची धडपड म्हणा वाटल्यास...पण मला वाटतं तुम्हीं इथून बाहेर पडावं...

**शकुंतला** : बाबुराव मला सोडणार नाहीं...

**विश्वनाथ** : निश्चयानं शेवटचा प्रयत्न तर करून पाहा... कदाचित् तो सोडील तुम्हांला...

**शकुंतला** : तुम्ही फार आशावादी आहांत...

**विश्वनाथ** : नाहीं... पण मला वाटतं, भरपूर मिळवलंय् त्यानं...आतां त्याचं समाधान व्हायला हरकत नाहीं... [ बाबुराव येतो. ]

**बाबुराव** : मी फार लवकर आलों ?

**शकुंतला** : यांना ओळखतोस तूं ?

**बाबुराव** : नाहीं !...

**विश्वनाथ :** मी विश्वनाथ कर्वे.

**बाबुराव :** तुमच्या नांवांत मला इंटरेस्ट नाहीं...

**विश्वनाथ :** माझ्या पत्रांत होता... ?

**बाबुराव :** कोणत्या पत्रांत ?

**विश्वनाथ :** चौदा वर्षांपूर्वीच्या...

**बाबुराव :** अच्छा,– तर तुम्ही 'ते' विश्वनाथ कर्वे !

**विश्वनाथ :** होय, मीच तो... तें पत्र...

**बाबुराव :** मीं फाडून टाकलं... बस्स ? इतकंच विचारायचं होतं ?

**विश्वनाथ :** आणखी एक.

**बाबुराव :** त्याचं उत्तर मी तुम्हांला तुम्ही विचारायच्या आधींच देतों... तुमची गोष्ट मींच नाकारली... एनिथिंग एल्स ?

**विश्वनाथ :** नथिंग...

**बाबुराव :** ठीक आहे. तुम्ही या क्षणींच इथून निघून घेलांत तर तुम्ही इथं कां आलां होतां हें मी विचारणार नाहीं..

**विश्वनाथ :** तुमच्या बहिणीशीं दोन शब्द बोलूं ?

**बाबुराव :** इतका वेळ बोलून नाहीं झालं ? ठीक आहे... परवानगी मागण्याचा चांगुलपणा तुम्हीं दाखवलात म्हणून ती देण्याचा चांगुलपणा मला दाखवायला हवा... तुम्ही बोलूं शकतां .

**विश्वनाथ :** ( शकुंतलेला ) मीं सांगितलं त्यावर तुम्ही नीट विचार करा. माझ्या घराचे दरवाजे तुमच्याकरतां कायमचे उघडे आहेत... येतों मी.

**बाबुराव :** एक मिनिट.

**विश्वनाथ :** माझं काम झालं. येतों मी... ( जायला निघतो. )

**बाबुराव :** पण आतां माझं काम आहे... बसा...

**शकुंतला :** त्यांना जाऊं दे...

**बाबुराव :** जातील ना ते... घाई काय आहे... ? तुमच्या घराचे दरवाजे हिच्याकरितां उघडे आहेत असं म्हणालांत तुम्ही... मतलब... ?

**विश्वनाथ :** सरळ आहे...

**बाबुराव** : शकुंतला...

**शकुंतला** : ( धीर एकवटून ) खरं आहे तें...

**बाबुराव** : तूं मला सोडून जाणार... ?

**शकुंतला** : मला माझं आयुष्य हवं आहे.

**बाबुराव** : तूं लग्न करणार आहेस यांच्याशीं ?

**शकुंतला** : हो...

**बाबुराव** : पण...

**शकुंतला** : माझं सारं आयुष्य सांगितलंय् त्यांना...

**विश्वनाथ** : मला सारं माहीत आहे...

**बाबुराव** : तरीहि तुम्ही तिच्याशीं लग्न करणार आहांत... ?

**विश्वनाथ** : निश्चित.

**शकुंतला** : बाबुराव, मला... मला सामान्य माणसाचं आयुष्य जगायचंय आतां. या नकली किळसवाण्या दुनियेंतून बाहेर पडायचंय... माझं... सारं वैभव तूं घे... मला त्यांतलं कांहीं नको... पण... पण मला परवानगी दे... मला सोड... मला माझं आयुष्य जगूं दे...

**बाबुराव** : ( क्षणभर स्तब्धता ) माझी... परवानगी आहे तुला... तूं खुशाल लग्न कर...

**शकुंतला** : बाबुराव... खरंच...

**बाबुराव** : पण एक विनंती आहे... आठ दिवसांनी तुमच्या शाळेचं नाटक आहे... तें तुला व्यवस्थित पार पाडायला हवं... मास्तरांना तसं कबूल केलंस तूं... त्या दिवसांपर्यंत तुम्ही भेटायचं नाहीं... मग तुझी तूं मुखत्यार आहेस... तूं कांहीं करूं शकतेस... तेवढीच घाई असेल तर शेवटचा पडदा पडल्यावर मी तुला मुक्त करायला तयार आहे... तूं त्या क्षणींहि जाऊं शकतेस....

( बाबुराव शांतपणें बारकडे जातो. विश्वनाथ आणि शकुंतला एकमेकांकडे पाहात असतांनाच अंधार... )

## दृश्य तिसरें

[ आठ दिवसांनंतर... **वेळ** : सायंकाळची. टेलिफोनची बेल वाजते. चंदर येऊन फोन उचलतो. ]

**चंदर** : कोण पाहिजे ? बाईसाहेब ? बोलावतों. जरा थांबा...( जिन्याकडे जाऊन ) साहेब, तुमचा फोन आलाय ..

**बाबुराव** : ( येत ) कुणाचा आहे फोन ?

**चंदर** : माहीत नाहीं साहेब...

**बाबुराव** : दॅट्स गुड...( रिसीव्हर उचलतो. ) हॅलो, मी बाबुराव.... बाईसाहेबांचा भाऊ... आल्या नाहींत तर येतील...इतक्या लवकर ? कशाला खुर्च्या लावायला ? नाटकाची वेळ नऊ आहे हें माहीत आहे आम्हांला. त्या येतील अर्ध्या तासांत. आणि हॅलो... पुन्हां फोन करूं नका... ( आरामांत सिगरेट पेटवतो. स्वतःच्याच नादांत. शकुंतला येते. मेकप केलेला, जाण्याच्या तयारीनें. )

**शकुंतला** : कुणाचा फोन होता ?

**बाबुराव** : तुझ्याकरतां नव्हता...

**शकुंतला** : आपल्याला निघायचंय ना ?

**बाबुराव** : जाऊं कीं सावकाश. एवढी घाई काय आहे ?

**शकुंतला** : घाई अशी नाहीं, पण...

**बाबुराव** : खुशींत दिसतेस !

**शकुंतला** : हो...

**बाबुराव** : कसली खुशी... ?

**शकुंतला** : कसली खुशी ? आज माझा शेवटचा दिवस...

**बाबुराव** ? कसला ?...

**शकुंतला** : तुला माहीत नाहीं... ?

**बाबुराव** : तुझ्या तोंडून ऐकायचं आहे.

**शकुंतला** : अस्सं...मग ऐक .. आज मी या घरीं परत येणार नाहीं...

**बाबुराव** : कुठं जाणार...?

**शकुंतला** : वाट फुटेल तिकडे...

**बाबुराव** : म्हणजे विश्वनाथाकडे ?... या बॅगेंत काय आहे...?

**शकुंतला** : उघडून बघ तूं...

**बाबुराव** : तुझ्यावर विश्वास आहे माझा.

**शकुंतला** : माझे थोडेसे कपडे...आणि खर्चापुरते १०० रुपये...

**बाबुराव** : १०० रुपये पुरतील ?

**शकुंतला** : इथलं कांहीं न्यायची इच्छा नाहीं मला...

**बाबुराव** : पण सारं तुझंच आहे...

**शकुंतला** : तुला देऊन टाकलंय् मीं सारं ... नाहीं तरी कशावर माझा अधिकार नव्हताच.

**बाबुराव** : तूं कायमची जाणार ?

**शकुंतला** : तुला अजून विश्वास नाहीं वाटत ...?

**बाबुराव** : मूर्खपणा करते आहेस तूं...

**शकुंतला** : स्वतःच्या इच्छेनं एकदां मूर्खपणा तरी करूं दे मला...

**बाबुराव** : लग्न केव्हां करणार आहांत ?

**शकुंतला** : कां ?

**बाबुराव** : का तशीच राहणार आहेस त्याच्याबरोबर ?

**शकुंतला** : बाबुराव.. समजतोस तूं कोण मला ? ...पण घे बोलून... शेवटचं...( बॅग उचलते. ) चला, आपल्याला उशीर होतोय्...

**बाबुराव** : ती बॅग ठेव खालीं .

**शकुंतला** : मला तूं अडवूं शकणार नाहींस ..

**बाबुराव** : मी कोण तुला अडवणार... ? पण तरीहि...

**शकुंतला** : तुझ्या मनांत काय आहे... ?

**बाबुराव** : आधीं ती बॅग खालीं ठेव... ( शकुंतला बॅग ठेवते. ) तुझ्या निश्चयापासून मला परावृत्त करायचं नाहीं तुला... पण एक लहानशी अडचण आहे... दोन दिवसांपूर्वी विश्वनाथनं गळफास लावून आत्महत्या केली...!

**शकुंतला :** नाहीं... नाहीं... शक्य नाहीं...

**बाबुराव :** माझा विश्वास नाहीं वाटत तुला... ?

**शकुंतला :** विश्वास... माझी खात्री आहे तुझ्याबद्दल... तूं हें सारं करूं शकशील...

**बाबुराव :** त्यानं आत्महत्या केली आहे...

**शकुंतला :** तूं मारलंस त्याला... !

**बाबुराव :** शट अप... त्यानं आत्महत्या केली आहे...

**शकुंतला :** कां...? कां मारलंस तूं त्याला ?...त्यानं तुझं असं काय केलं होतं... ? एक साधा सज्जन माणूस... काय मिळालं तुला त्याला मारून... ? माझ्यामुळं मारलंस त्याला... माझ्यामुळं मग मलाच कां नाहीं ठार मारलंस... ? मी सुटलें असतें या जगांतून... या साऱ्या... साऱ्यांतून... कां नाहीं मारलंस मला ?

**बाबुराव :** तुझं डोकं फिरलंय्...

**शकुंतला :** आतां मला तो कधीं पुन्हा भेटायचा नाहीं...

**बाबुराव :** आपल्याला जायला उशीर होतोय्...

**शकुंतला :** कुणाकडे ? त्याच्याकडे ? ( वेड्यासारखी हंसते. )

**बाबुराव :** माणसं मरत नाहींत कधीं ? असं डोकं फिरल्यासारखं वागायला काय झालं ?

**शकुंतला :** माझं कांहीं चुकलं ?

**बाबुराव :** आज नाटक आहे हें विसरलीस ?

**शकुंतला :** कांहींच विसरूं शकणार नाहीं मी... विश्वनाथला गळफास लागला, तो तडफडून तडफडून हातपाय झाडत मेला असेल .. जीभ बाहेर आली असेल... डोळे बाहेर आलेले... माझ्यामुळं तो मेला...माझ्यामुळं... इतकं वाईट— भयंकर मरण आलं त्याला... !

**बाबुराव :** तूं गप्प बसणार आहेस कीं नाहीं ?

**शकुंतला :** मला कांहीं सुचत नाहीं.

**बाबुराव** · मूर्ख आहेस तूं... आणि त्यांतून दुःख करायचं असेल तर

तें मरणाऱ्याचं करावं, मेलेल्याचं नाहीं... तो मेला.. पुढं काय ? तूं थांब... तुला थोडीशी...

**शकुंतला** : नाहीं नाहीं, आज मी घेणार नाहीं.

**बाबुराव** : कां ? सुतक म्हणून ? दारूला सुतक नसतं.

**शकुंतला** : आज माझ्या शाळेकरितां प्रयोग आहे. सर येणार आहेत पहायला, आणि मीं त्यांना वचन दिलंय्.

**बाबुराव** : मला विचारल्याशिवाय...

**शकुंतला** : तूं नव्हतास त्या वेळेला तिथं...

**बाबुराव** : मग तें वचन पाळायची गरज नाहीं...

**शकुंतला** : मी आज नाहीं पिणार.

**बाबुराव** : तुझं वचन गेलं खड्ड्यांत !

**शकुंतला** : पण तें वचन मीं सरांना दिलंय्...

**बाबुराव** : कांहीं पाप लागत नाहीं आणखी...

**शकुंतला** : पापाकरतां... नाहीं...मी माझ्याकरता पिणार नाहीं...

**बाबुराव** : तुला घ्यावी लागेल !

**शकुंतला** : कां माझ्यावर सक्ति करतोयस ?

**बाबुराव** : कारण तुझं आज लक्षण ठीक नाहीं. डोकं फिरल्यासारखी वागत आहेस तूं... घेतल्याशिवाय आज तूं स्टेजवर उभीच राहूं शकणार नाहींस...

**शकुंतला** : नाहीं, मला आत्मविश्वास आहे.

**बाबुराव** : तो इथंच राहील...

**शकुंतला** : मी नाहीं पिणार...

**बाबुराव** : न पितां काम करतां नाहीं यायचं तुला.

**शकुंतला** : कां ? तूं मला भीति दाखवतोस ?

**बाबुराव** : मी तुला परिस्थिति समजावून सांगत आहें. स्टेजवर काम करतांना तुला विश्वनाथ आठवेल ... लोंबणारी जीभ ... बाहेर आलेले डोळे...

**शकुंतला** : नाहीं...नाहीं...

( शकुंतला ग्लास तोंडाला लावते, संपवते. बाबुराव आणि ती जातात. संपूर्ण अंधार... )

( प्रकाशझोत येतो तेव्हां शकुंतलेला बेभान अवस्थेंत घेऊन येतात. बाबुराव तिला सोफ्यावर बसवतो. बाकीचीं माणसं निघून जातात. बाबुराव फ्रिजकडे पाणी आणण्यासाठीं जातो. शकुंतलावर प्रकाशझोत. )

**शकुंतला** : सर...सर...वचन मोडलं मीं सर... दारू पिऊन आज मी स्टेजवर गेलें. आणि शेवटीं व्हायचं तेंच झालं. तुमची मान शरमेनं खालीं गेली असेल. मला प्यायची नव्हती सर पण मला पाजली...मी असहाय आहें. दुबळी आहें. तुम्हीं मागितलेली एक गोष्ट मला करायची होती सर. पण मी ती करूं शकलें नाहीं. मी आयुष्यांत कांहींच करूं शकलें नाहीं. माझ्या पापाचा गुणाकार होत चाललाय्. हीं पापं अशींच वाढत जाणार आहेत. त्यांना अंत नाहीं. कुठं येऊन पोंचलें मी ? कुठं जायचं होतं मला ? ...खरंच कुठं जायचं होतं ? मला लग्न करायचं होतं. मला संसार करायचा होता. मला मुलंबाळं हवीं होतीं. या चंदेरी दुनियेंत मी मासोळीसारखी तडफडत होतें. त्या प्रकाशाच्या झोतांतून बाहेर पडायचं होतं. पण तें झालं नाहीं . हा चेहरा प्रथम रंगवतांना मला कल्पना नव्हती, कीं त्याच हातानं माझ्या आयुष्याला मी काळोखी फासतेंय्; ही वैभवाची वाट पापाच्या चिखलांतून जात असेल याची कल्पना नव्हती मला...मी फसलें...या चिखलांत रुतून गेलें...बाहेर येण्याची धडपड करतां करतां आणखी रुतत गेलें, आणि हें सारं, सर, एका माणसामुळं... त्याच्या स्वार्थामुळं. हिंस्र पशूसुद्धां त्याच्याहून अधिक दयाळू असतील...माझा भाऊ.. तुम्हीं मला विचारलं होतं मी लग्न कां नाहीं केलं सर...कां नाहीं बंड केलं...माझ्या पायांत मणामणाच्या बेड्या अडकल्या होत्या. सर, एका मोहाच्या क्षणीं माझा तोल गेला...जें करायला नको तें मीं केलं. आणि सर, त्या भयंकर पापाचीं छायाचित्रं घेतलीं त्या नराधमानं...आणि त्याच्या बळावर आयुष्यभर गुलाम केलं मला . मला नाचवली...हवी तशी खेळवली. वापरली,— स्वतःच्या स्वार्थाकरितां. त्या भीतीच्या दडपणाखालीं माझं सारं आयुष्य गुदमरून गेलंय्. आणि कुणी भावनेच्या आहारीं जाऊन मला या

पापासकट स्वीकारील म्हणून कुणाला जवळ येऊं दिलं नाहीं माझ्या. या दुनियेंत पातिव्रत्य, शील या गोष्टी गृहीतच नाहींत. पण म्हणून माझ्या मनाची लाज मी कशी विकूं ? हें कधींच कुणालाच कळणार नाहीं. दिसेल फक्त पिणं. हें आतां असंच चालू राहणार... शेवटपर्यंत... उतरणीला लागलेला दगड असाच कधीं तरी दरींत कोसळणार... ठिकऱ्या ठिकऱ्या होणार त्याच्या. सोनेरी पानं संपलीं. आतां फक्त उरलीं पापं...त्याचा घडा आतां लवकर भरला पाहिजे... लवकर भरला पाहिजे...

( बाबुराव पाणी घेऊन येतो. )

**बाबुराव :** हें पाणी घे...जरा बरं वाटेल...

**शकुंतला :** पाणी ?...पाणी नकोय् मला. माझा ग्लास आण...... !

( हळूहळू अंधार...पडदा )

समाप्त

म. ग्रं. ... वाचनालय ...
... 20008 नों. दि 28.1.90 153
नाटक ... ...
IRBK-0120004
५१